## प्रकरण तिसरे

# शिवाजी सावंत यांचे चरितकहाणी लेखन

# प्रकरण तिसरे
# शिवाजी सावंत यांचे चरितकहाणी लेखन


प्रास्ताविक

३.१ चरित्रवाङ्मयाचे स्वरूप

३.२ लढत

- ३.२.१ विठ्ठलराव विखे पाटील यांचे व्यक्तिमत्व
- ३.२.२ कृषिक्षेत्रातील कार्य
- ३.२.३ सहकार क्षेत्रातील कार्य
- ३.२.४ शैक्षणिक कार्य
- ३.२.५ सामाजिक कार्य
- ३.२.६ राजकीय सहभाग
- सारांश

३.३ संघर्ष

- ३.३.१ भाई मनोहर कोतवाल यांचे व्यक्तिमत्त्व
- ३.३.२ स्वातंत्र्य चळवळीतील योगदान
- ३.३.३ मुंबई येथील गिरणीकामगारांच्यासाठी केलेले कार्य
- ३.३.४ गोदी कामगार आणि माथाडी कामगारासाठी केलेले कार्य
- ३.३.५ वाराई कामगार यांच्यासाठी केलेले कार्य
- ३.३.६ राजकीय सहभाग
- सारांश

३.४ पुरूषोत्तमनामा

- ३.४.१ पी.के. अण्णा पाटील यांची जडणघडण
- ३.४.२ पी.के. आण्णांचे सहकार क्षेत्रातील कार्य
- ३.४.३ शैक्षणिक क्षेत्रातील कार्य
- ३.४.४ स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग
- ३.४.५ राजकीय सहभाग
- ३.४.६ पुरूषोत्तमसेना
- सारांश

३.५ शिवाजी सावंत यांच्या 'चरितकहाणी'चे वाङ्मयीन विशेष

समारोप

संदर्भटिपा

# प्रकरण तिसरे
# शिवाजी सावंत यांचे चरितकहाणी लेखन

## प्रास्ताविक :

'शिवाजी सावंत यांचे कादंबरी लेखन' या दुसऱ्या प्रकरणात त्यांच्या 'मृत्युंजय', 'युगंधर', 'छावा' या कादंबऱ्यांच्या वाङ्मयीन विशेषांचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत प्रकरणात 'लढत' 'संघर्ष' आणि 'पुरूषोत्तमनामा' या चरितकहाण्यांचा अभ्यास करणार आहोत. या चरितकहाणीमधून अनुक्रमे विखे पाटील, भाई मनोहर कोतवाल आणि पी.के. अण्णा पाटील या कर्तृत्ववान पुरूषांच्या जीवनवृत्तांताचा, जीवनसंघर्षाचा आणि त्यांच्या कार्याचा चरित्रात्मक वेध प्रस्तुत प्रकरणात घेणार आहोत. या तिघांनीही व्यक्तिगत जीवनाच्या मर्यादा ओलांडल्या आणि त्यांचे जीवन संस्थात्मक-समष्टीगत झाले. त्यामुळे त्यांच्या चरितकहाण्या त्यांच्या समकालीन समाजजीवनाचा, संस्थात्मक जीवनाचा प्रत्यय देणाऱ्या वाटतात. संस्थात्मक आणि सामाजिक जीवनातील ताणतणाव, अनुकूल प्रतिकूल क्रिया प्रतिक्रिया, सामाजिक संघर्ष, अर्थकारण, सहकार अशा घटकांनी हे लेखन कसे समृद्ध झाले आहे. याचा वेध प्रस्तुत प्रकरणात घ्यावयाचा आहे.

सावंत यांच्या चरितकहाण्यांचा अभ्यास यथार्थ होण्याच्या दृष्टीने मराठी साहित्यातील चरित्रवाङ्मयाचे स्वरूप आणि त्यांचा मागोवा घेणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## ३.१ चरित्रवाङ्मयाचे स्वरूप :

मराठी वाङ्मयात काव्य, कादंबरी, नाटक या वाङ्मय प्रकाराप्रमाणेच 'चरित्रवाङ्मय' हा प्रकारही पूर्वीपासूनच रूढ झालेला दिसून येतो. जुने पोवाडे, बखरी या लेखनामागील खरी प्रेरणा वीर पुरूषांच्या पराक्रमाचे गुणगान करून त्यातून त्यांचे समग्र चरित्र वर्णन करणे हीच दिसून येते. वीर पुरूषांच्या प्रमाणेच समाजात मान्यता पावलेल्या साधुसंताची थोरवी गाणारी विपुल रचनाही दिसून येते. अशा स्वरूपाची मराठीतील मध्ययुगीन रचना म्हणजे महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर स्वामी यांच्या आठवणी ग्रंथित केल्या आहेत. असा 'लीळाचरित्र' हा ग्रंथ होय याची रचना चक्रधरांचा शिष्य म्हाइंभट याने इ.स. १२७६ मध्ये केली. हा ग्रंथ मराठीतील पहिला चरित्रात्मक ग्रंथ होय.

मध्ययुगीन काळात लिहिली गेलेली चरित्रे माहितीपूर्ण असून पुढील चरित्रकारांस उपयुक्त ठरली आहेत. त्यांची बैठक श्रद्धायुक्त भक्तिभावनेची आहे हे ध्यानात येते. आजच्या विश्वसनीयतेच्या कसोटीत ती उतरण्यासारखी नाहीत. दैवी चमत्कारांच्या वर्णनांनी ती भरलेली आहेत. तो काळच दैवी सामर्थ्यावरील श्रद्धेचा व साधुसंतांविषयीच्या आत्यंतिक आदरभावनेचा होता. येथे संबंधित काळाचा संदर्भ व त्या त्या काळातील परिस्थितीनुसार 'व्यक्ती, काळ आणि कर्तृत्त्व' वर्णन करणारी चरित्रे दिसतात. स्वातंत्र्योत्तर चरित्रात ऐतिहासिक संदर्भाबरोबरच साहित्याच्या अंगाने लेखन झालेले दिसून येते. मराठी चरित्र वाङ्मयातील काही चरित्र विशेष उल्लेखनीय आहेत. त्यात पुढील काही चरित्रांचा अंतर्भाव करावा लागेल.

'टिळक चरित्र', (न.चि. केळकर), 'सयाजीराव महाराज', (दा.ना. आपटे), 'आदर्श भारतसेवक' (न.र. फाटक), 'माधव ज्युलियन' (गं.दे. खानोलकर), 'डॉ. केतकर' (द.न. गोखले), 'नाटककार खाडिलकर' (पु.रा. लेलेकृत), 'रवींद्रदर्शन' (वि.स. सुखटणकर), 'यांत्रिकाची यात्रा' (शं.वा.किर्लोस्कर), 'राजा शिवाजी' (गो.स. सरदेसाई), 'छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र' (वा.सी. बेंद्रे), 'हिटलर' (वि.स. वाळिंबे), 'मं.गांधी' (प्रा. नलिनी पंडित), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' (डॉ. भालचंद्र फडके), 'सावरकर : एक रहस्य' (डॉ. द.ना. गोखले), 'क्रांति ज्योती सावित्रीबाई ज्योतीराव फुले' (डॉ. मा.गो. माळी), 'डॉ. आंबेडकर' (धनंजय कीर), 'गांधीजी : मानव नि महामानव' (द.न. गोखले), 'आगरकर' (य.दि. फडके), डॉ. आनंदीबाई जोशी – काळ आणि कर्तृत्व (अंजली किर्तने), 'तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा' (योगिराज बागुल), 'नेक नामदार गोखले' (गोविंद तळवलकर), 'र.धों. कर्वे' (य.दि. फडके), 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य' (गो.मा. पवार), 'लाल बहादूर शास्त्री' (अनुवाद – अशोक जैन), 'इंदिरा गांधी' (अनु. अशोक जैन), 'नवलकथा एका पुरूषार्थाची' (राजा मंगळवेढेकर), 'श्री राजा शिवछत्रपती' (गजानन भास्कर मेहेंदळे), 'वेध महामानवाचा' (श्रीनिवास सामंत), 'स्वरभास्कर' (शंकर अभ्यंकर), 'झाशीची राणी लक्ष्मीबाई' (प्रतिभा रानडे), 'महाराणी व्हिक्टोरिया' (आशा कर्दळे), 'डॉ. रमाबाई : एक आर्त' (मोहिनी वर्दे). 'कस्तुरबा-शलाका तेजाची' (अनु. अशोक जैन), 'कहाणी लंडनच्या आजीबाईची' (सरोजिनी बाबर), 'धीरूभाई अंबानी' (दिनकर पंड्या अनु. गिरीश दाबके), 'लोकराजा शाहू छत्रपती', (रमेश जाधव) इत्यादी चरित्रांचा उल्लेख करावा लागेल.

स्वातंत्र्याच्या चळवळीने वेग घेतलेला दिसतो. या चळवळीचे उद्‌गाते व स्वातत्र्याविषयी कार्य करणाऱ्या नेत्यांची चरित्रे लिहिली गेलेली दिसून येतात. समाजसुधारक स्त्री-शिक्षण विषयक सुधारक, शिक्षणतज्ज्ञ यांच्याबरोबरच समाजाच्या आजपर्यंत मागासलेल्या घटकांचा विचार करणारे समाजचिंतक, तसेच सहकार चळवळीत कार्य करणारे सहकारमहर्षी यामध्ये म. फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वि.रा. शिंदे, भाऊराव पाटील, विखे पाटील, पी.के. अण्णा पाटील, धनंजयराव गाडगीळ इत्यादींची चरित्रे उल्लेखनीय ठरली आहेत.

क्रीडा क्षेत्रातील दर्जेदार खेळाडूंच्या व्यक्तिमत्त्वाची चरित्र रेखाटने ही याच काळात आहेत. विशेषत: रणजी, रोहन कन्हाय, सी.के. नायडू, गावसकर यांच्यासारखे क्रिकेटपटू शेर्पातेनसिंग सारखा गिर्यारोहक, मिहिर सेन सारखा जलतरणपटू यांची चरित्रे उल्लेखनिय आहेत. याचबरोबर नाट्य, चित्रपट, कला, शिल्प, संगीत या क्षेत्रातील मातब्बर कलावंतांची चरित्रे आहेत. यामध्ये प्रामुख्याने बालगंधर्व, बडेगुलाम अलीखाँ, लता मंगेशकर, या संगीत क्षेत्रातील कलाकाराची चरित्रे लिहिलेली आढळतात.

मराठीतील चरित्रवाङ्मयाचे स्वरूप आणि महत्त्वाच्या चरित्रग्रंथांचा संक्षिपाने नामनिर्देश केला. या पार्श्वभूमीवर शिवाजी सावंत यांच्या 'लढत', 'संघर्ष', 'पुरूषोत्तमनामा' या चरितलेखनाचा विचार पाहू. शिवाजी सावंत यांनी 'चरितकहाणी' असा या ग्रंथासाठी सोयीचा शब्दप्रयोग वापरला आहे. हे ग्रंथ तसे त्या कर्तृत्त्वपुरूषांची चरित्रेच आहेत. सावंतानी स्वत:च्या सोयीसाठी 'चरितकहाणी' असा शब्दप्रयोग वापरला आहे असे वाटते. 'लढत' चरितकहाणीच्या प्रस्तावनेत 'विठ्ठलरावाची चरितकहाणी आहे. तो चरित्रग्रंथ नव्हे. चरितकहाणीला तिचा म्हणून एक परमोच्च उंचीचा क्षण असतो तिथेच ती थांबणे अपरिहार्य असते.' (पृष्ठ ५) असा निर्देश केला आहे.

### ३.२ लढत : (१९८५)

लढत ही कृषी आणि सहकार क्षेत्रातून समृद्धीचे नंदनवन उभे करणाऱ्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील यांची चरितकहाणी आहे. ही चरितकहाणी सावंतानी दोन भागात शब्दबद्ध केली आहे. यातील पहिला भाग ४०९ पृष्ठसंख्येचा तर दुसरा भाग ३५५ पृष्ठसंख्येचा असून विखेच्या जन्मापासून ते १९६१ पर्यंतचा त्याच्या कृषी, सहकार या क्षेत्रातील कार्यासंदर्भाचा जीवनवृत्तात आहे. सावंतानी ही

जीवन कहाणी धावणी पाहिली (पेरणी–लहानू), धावणी दुसरी (निगराणी–पाटील), धावणी तिसरी (कापणी–आप्पा), धावणी चवथी (मळणी–सहकारी आप्पा), धावणी पाचवी (रास पद्मश्री आप्पा) असे विभाग करून लेखन केले आहे. 'धावणी' हा शब्द विखे पाटील यांच्या एकूण कार्यासंदर्भात सावंतानी वापरला आहे.

सावंतानी विखे पाटील यांच्या जन्मापासून (१८९७) ते 'प्रवरा सहकारी साखर कारखाना उभा करेपर्यंतच्या कार्याचा आलेख वाचकासमोर उभा केला आहे. त्यांच्या जीवनाचा वेध घेताना सावंतानी तत्कालीन महाराष्ट्र, ग्रामीण संस्कृती, व्यवहार, शेती परिषद, कृषी विकास, सहकार चळवळ, त्या काळातील सामाजिक, आर्थिक राजकीय पार्श्वभूमी, त्या काळातील राजकीय, सामाजिक कार्य करणारे नेते या ठळक विषयावर भाष्य केले आहे. हे भाष्य तत्कालीन काळ उभा करणारे आहे.

विठ्ठलराव विखे पाटील यांचे व्यक्तिमत्त्व, कृषी, सहकार, शिक्षण, राजकारण, सामाजिक या क्षेत्रातील त्यांचे कार्य या मुद्यांच्या आधारे त्यांच्या 'लढत' या 'चरितकहाणी' वेध घेणार आहोत.

### ३.२.१ विठ्ठलराव विखे पाटील यांचे व्यक्तिमत्व :

विठ्ठलराव विखे पाटील यांचा जन्म १८९७ साली एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्याचे जन्मगाव लोणी बुद्रुक (श्रीरामपूर) पुण्याजवळच्या जेजुरीचे त्यांचे मूळ घराणे होते. त्यांचे वडिल एकनाथराव तर आईचे नाव गंगुबाई होते. मायेने सर्वजन तिला गंगाई म्हणत. विठ्ठलरावांना ताताब्या आणि दगडूबा असे दोन चुलते होते. तात्याबाला मुरलीधर, रामकृष्ण असे दोन मुलगे तर दगडूकाकाला अपत्य नव्हते. विठ्ठलरावाना कान्होबाई, द्वारकाबाई, बबई, बड्याबाई, वेणूबाई अशा पाच बहिणी होत्या. विठ्ठलरावांच्या जन्मानंतर एकनाथराव विखे पाटलांना दोन जुळ्या मुली झाल्या. त्या लहानपणीच वारल्या. विठ्ठलरावांना शंकरराव हे मोठे बंधू होते. विखे पाटीलांच्या घरात मुलींची संख्या अधिक होती. विठ्ठलरावांना गंगाईकडून तीन मामा हाते. आनंदराव, भीमराव आणि विठ्ठलराव या तीनही मामानी भाचा विठ्ठल याला अतिशय मायेची, लाडाची वागणूक दिली मामा–भाचराचं हे लाखमोलाचं नातं होते. लोणीत विठ्ठलरावांचं बालपण पाच बहिर्णींच्या आणि शंकरदादांच्या सहवासात मजेत गेले. बालपणी विठ्ठलराव आपली आई गंगाईपेक्षा ते अधिक राधाज्जींच्या सहवासात राहिले. राधाज्जी हे विठ्ठलरावांच्या जीवनातील मर्मबंधाचं नातं होतं. या गावरान आजीच्या ठायी व्यावहारिक कुशलपण ठासून भरले होते. ती दिसायला गोरीपान,

शिडशिडीत, अंगलटीची व तरतरीत होती. घारीचं घरट्यातल्या पिलावर असावं, तसं तिचं आपल्या दोन्ही नातवांवर सदैव आणि सावध लक्ष होते. विठ्ठलरावाचं आपल्या शंकरदादावर आदरयुक्त प्रेम होते. शंकररावही कमालीचे कष्टाळू होते.

विठ्ठलराव 'लोणी'च्या शाळेत दाखल झाले. त्या शाळेत ते फार काळ रमू शकले नाहीत. कसेबसे इयत्ता चौथीचा उंबरठा ते गाठू शकले. चौथीच्या शाळेतून पारख्या झालेल्या विठ्ठलरावांनी 'लोणी' भवतीच्या मोकळ्या आभाळाखाली निसर्गाची शाळाच आपली मानली.

१९व्या शतकातील पहिल्या दशकाचा काळ होता. त्या काळात शेतकऱ्यांच्या पिकानं भरलेल्या शिवारांवर हटकून टोळधाडी पडत असत. लोणीच्या शिवारावर पडलेली टोळधाड विठ्ठलरावांनी सहाव्या वर्षीच पाहिली होती. शेतातील उभ्या पिकांचे या टोळधाडीने नुकसान झाले. या नैसर्गिक आपत्तीचा खोलवर ठसा त्यांच्या बालमनावर स्पष्ट उमटला. विशेषत: यावेळी गावकरी व मुलं बाळं टोळांची अंडी गावचावडीवर पायली मापट्यानं मोजून घालून त्यासाठी मिळणारे आने-रूपये घेताना विठ्ठलरावांनी पाहिले. याचाही सखोल परिणाम त्यांच्या बालमनावर झाला होता. उभं पीक फस्त करणारे टोळ आणि त्यातील अंडी विकणारी माणसं असा जीवनातील कमालीचा विरोधाभास बालवयातच त्यांना स्पर्शून गेला होता.

बालवयातच विठ्ठलरावांच्यावर शेतीच्या राखणीची जबाबदारी पडली. गुरंढोरं, शेळ्यामेंढ्या चरणीला सोडून बांधावरच्या झाडाच्या सावलीत विठ्ठलराव भागवत, महाभारत,नवनाथ कथासार, दासबोध, पांडवप्रताप अशी कुठली ना कुठली तरी पोथी वाचत असत. शिवारातल्या शाळेत पेरणी, कोळपणी, उपणणी, मळणी असे शेतीचे धडे गिरवण्यात व घरची नित्यनेमाची पोथी ऐकण्यात विठ्ठलरावांना रस होता. लोणीतील सगळे लोक त्यांना 'धाकले पाटील' म्हणत होते. घरच्या 'सारंगी' नावाच्या घोडीवर बसून शेतावर फेरफटका मारून येऊ लागले. विठ्ठलरावाचे पहिले लग्न (१९१५-१६ साली) पाथरे बु।। येथील श्री गणपतराव घोलप-पाटील यांची कन्या 'जाईबाई' हिचेशी झाले. तिचे सासरी पार्वतीबाई असे नाव ठेवण्यात आले. पार्वतीबाईनी दोन मुलीना जन्म दिला. पण त्या लहानपणीच वारल्या. मित्रवर्य बाबुराव महाराज जोशी यांच्या आग्रहाने विठ्ठलरावानी दुसरे लग्न अस्तगाव (ता. कोपरगाव) येथील द्रोपदीबाईशी केले. त्यांना एक मुलगा झाला. ते म्हणजे आजचे खा. एकनाथ

उर्फ बाळासाहेब विखे पाटील होय. तर त्यांच्या तिसऱ्या पत्नी वेणूबाई लोणी खूर्दच्या आहेर घराण्यातील होत्या. त्यांच्यापासून दुसर मुलगा झाला तो 'भाऊसाहेब' होय.

विठ्ठलराव विखे पाटील यांची तीन लग्ने झाली होती. दत्तभक्त असलेल्या विठ्ठलरावांनी आपल्या भक्त मैत्रीच एक 'पोथीमंडळ' सुरू केले होते. ते दत्तदर्शनासाठी 'सायळ' गावी 'तर' 'पुणतांबे' गावी चांगदेव महाराजांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी येत. चांगदेव महाराजांच्या समाधीला साक्षी ठेऊन मूकपणे मनोमनी उच्चारलेला 'अलकनिरंजन' पुढे त्यांच्या जीवनभर नांदीसारखा निनादत राहिला. जेव्हा केंव्हा ते जीवनाच्या वाटचालीत अडी-अडचणीत आले तेव्हा तेव्हा डोळे मिटून ते स्वत:शीच 'अलक निरंजन' 'गुरूदेव दत्त' पुंडलिका वरदा हरी विठ्ठल ! असे म्हणत. याप्रेरणेने विठ्ठलरावांचे कुणबाऊ मन आत्मविश्वासाने भरून येई. समोर केवढेही संकट आले तरी विठ्ठलराव मुळीच डगमगत नसत. भाऊ शंकरदादानी श्वासाच्या विकारानं शेतावरच्या बांधावरच निष्प्राण देह ठेवला. त्यावेळी घरची व शेतीची जबाबदारी विठ्ठलरावांनी पेलली. हे आव्हान पेलत असतानाच वडिल एकनाथराव विखे पाटील (१९२३) यांचे दु:खद निधन झाले. भाऊ आणि वडिल यांच्या निधनामुळे विठ्ठलराव पूर्णत: एकाकी झाले. 'लोणी' गावची पाटीलकीची जबाबदारी त्यांच्यावर आली. गावच्या न्यायनिवाडाची जबाबदारी त्यांनी व्यवस्थित पार पाडली. शेती, गावची पाटीलकी, आणि मनामध्ये देशस्वातंत्र्याची कल्पना बाळगून विठ्ठलराव आपले दररोजचे जीवन जगत होते. म. गांधी, पंडित नेहरू, गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता या सर्वांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. शेतकऱ्यांना सावकारांच्या पाशातून मुक्त करण्यासाठी पतपेढ्या काढल्या. शेतकऱ्यांच्या मदतीने साखर कारखाना उभा केला. शैक्षणिक संस्था काढल्या. विठ्ठलराव जीवन एक झुंज मानून ती जिंकण्यासाठी प्राणपणानं लढले. त्यांच्या या सर्व धडपडीत दिनदुबळ्यांविषयी करूणा होती.

पायात नगरी बाकदार जोडे, कमरेला चुनीदार धोतर, अंगातल्या शर्टावर खाकी कपडाचा दुहाती मोठे खिसे असणारा कोट, खिशात नानाविध देशी गोळ्यांची अटकर थैली, डोक्यावर पागोटं कपाळी वारकऱ्यांचा टिळा, कोटाच्या खिशात चटणी-भाकरीचे कपड्यात बांधलेले गठूडं असा त्याचा साधा पेहराव होता. एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले विठ्ठलराव विखे पाटील आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर कृषिक्षेत्रात महान क्रांती घडवितात. प्रवरा सहकारी साखर कारखाना या

नावाने आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना उभा करतात. ही अभिमानाची गोष्ट आहे. १९६१ साली भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या शुभहस्ते कारखान्याचे उद्‌घाटन झाले. विठ्ठलरावांनी निर्माण केलेल्या प्रचंड कार्याचे नेहरूनी तोंड भरून कौतुक केले. साखर कारखाना, शैक्षणिक संस्था, औद्योगिक, सामाजिक उपक्रम या सर्वांच्या माध्यमातून प्रवरानगरचे नंदनवन घडविले. स्व.इंदिरा गांधी आणि शंकरराव चव्हाण यांच्या उपस्थितीत विठ्ठलरावांचा अमृतमहोत्सव संपन्न झाला. पुणे विद्यापीठाची डी.लिट. राहुरी कृषी विद्यापीठ 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही सन्मानाची पदवी त्याना लाभली. पद्‌मश्री हा किताब देऊन भारत सरकारने विखे पाटील यांचा सन्मान केला.

विखे पाटील भागवत पंथाच्या विचाराचे होते. पोथी पठन लहानपणापासून दररोज ते करत होते. मात्र त्यांनी आपले क्रियाशील निर्माण कार्य कधीच पोथीबंद होऊ दिले नाही. त्यांनी सततच्या धावपळीने व तळमळीने 'श्रमाची', 'पोथी' निर्माण करून दाखविली. ध्येयपूर्तीसाठी झगडणारा, शेती आणि शेतकऱ्यावर प्रेम करणारा शिक्षणाची आच असणारा, निरक्षर गोर-गरिबांच्या विकासाचा ध्यास घेणारा. अंधश्रद्धेविरूद्ध बंड करणारा एक सक्रीय कार्यकर्ता हे विखे पाटीलांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू 'लढत' मध्ये प्रकर्षाने प्रकट झालेले आहेत. महाराष्ट्रामध्ये जी काही मोजकीच निर्मितीक्षम माणसे झाली त्यातील विठ्ठलराव विखे पाटील हे एक महत्त्वाचे नाव होते. अशा या विखे पाटील यांचा २७ एप्रिल, १९८० रोजी वयाच्या ८२व्या वर्षी मृत्यू झाला. त्यांनी आपली मार्गदर्शक व प्रेरक अशी जीवन 'लढत' संपविली.

विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जीवनाचा आलेख पाहिल्यानंतर त्यांनी केलेल्या कृषी, सहकार, शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा आलेख पाहणे गरजेचे वाटते. लोणी बुद्रुक व परिसरात आपल्या कर्तृत्त्वाने कृषी, सहकार क्षेत्रात नंदनवन फुलविणाऱ्या विखे पाटील यांचे कार्य पहाणे महत्त्वाचे वाटते.

### ३.२.२ कृषी क्षेत्रातील कार्य :

विठ्ठलराव विखे पाटील भागवत पंथाच्या विचारांचे होते. पोथीपठन दररोज ते करीत होते. मात्र त्यांनी आपले क्रियाशील निर्माण कार्य कधीच पोथीबंद होऊ दिले नाही. त्यांनी सततच्या धावपळीने व तळमळीने 'श्रमाची पोथी' निर्माण करून दाखविली. ते स्वत: शेतकरी होते. वृत्तीने दत्तभक्त असले तरी आपला गाव 'लोणी' व याबरोबरच परिसरातील कृषी क्षेत्राचे नंदनवन कसे होईल हाच विचार त्यांच्या मनात

असे. श्रीमंत बागाईतदार यानाच फक्त 'भंडारदरा' धरणाचे पाणी दिले जात होते. गरीब, अल्पभूधारक या शेतकऱ्याच्या शेतीला पाणी दिले जात नव्हते. हे सर्वच शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीला समान पाणी मिळाले पाहिजे असा त्यांचा अट्टाहास होता. त्याप्रमापणे 'भंडारदरा' धरणाचे पाणी मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. या काळात शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा, त्यांच्या दारिद्र्याचा फायदा सावकार घेत होते. सावकार कर्जापोटी शेती बळकावित होते. शेतकऱ्यांच्या संसाराच्या साहित्याचे लिलाव होत होते. निरक्षर असलेले स्त्री-पुरूष मुकाटपणे गावात होणारे हे जप्तीचे लिलाव डोळे विस्फारून बघत हाते. या सर्व प्रतिकूल परिस्थितीचा विचार करून 'लोणी बुद्रुक सहकारी पतपेढी' विखे पाटील यांनी स्थापन करून शेतकऱ्यांना या सावकारी पाशातून मुक्त केले. अंधश्रद्धातून शेतकऱ्याना मुक्त करण्यासाठी प्रबोधनात्मक उपक्रमातून जनजागृती केली. विखे पाटील शेती आणि शेतकऱ्यावर प्रेम करीत. लगड नावाच्या शेतकऱ्याचा व्यापाऱ्यानी कमी भावाने गुळ मागितल्यामुळे त्याचा मृत्यु होतो. या शेतकऱ्याचा त्यांना कळवळा येतो. गावकऱ्यासमोर सडेतोडपणे ते म्हणतात, "शेतकऱ्याला, काळ्या आईच्या या कष्टाळू पोराला कुणी वाली उरलाय की नाही ? का ? कशासाठी, कुठवर चालायचं हे ! लोहार मेटाच्या तापल्या कांबेवर घणामागून घण दणदणावेत तसा एकच एक विचार विठ्ठलरावांच्या मस्तकात ठणकू लागला," शेतकऱ्यावर प्रेम करणारे विठ्ठलराव पाटील यांनी 'पतपेढी' शेतकरी परिषद, साखर कारखाना या संस्थामार्फत शेतकऱ्यांचा विकास केला. सर्वच शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून दिले. दि बागाईतदार को ऑप शुगर प्रोड्युसर सोसायटी लि. लोणी बुद्रुक या संपूर्ण देशातील पहिल्याअठरा पगड शेतकऱ्यांची सोसायटी स्थापन करून त्यामार्फत परिसराचे नंदनवन केले. पाणीपुरवठा योजना, शेतीमध्ये नवनवे प्रयोग करून ऊस उत्पादन वाढीसाठी शेतकरी परिषदेमार्फत प्रबोधन केले. एकरी जादा उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याना प्रोत्साहनपर बक्षिस योजना, कृषी विकासात्मक कार्यक्रम इत्यादी महत्त्वाची कामेही विखे पाटील यानी केली. साखर कारखान्यामार्फत शेती सुधारणेसाठी 'शेती सुधारणा' निधीतून शेतकऱ्यांचा विकास केला. या सर्व कृषी क्षेत्रातील विकासात्मक धोरण चांगले राबविल्यामुळे नामवंत अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ पंडित जवाहरलाल नेहरू, यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी, वैकूटभाई मेहता यांनी त्यांचे कौतुक करून शाबासकीची थापही दिली. स्वत: शेतकरी कुटुंबात जन्मलेला, शेतकऱ्यासाठी आशियाखंडातील पहिला साखर

कारखाना काढणारा, या परिसरातील कृषी क्षेत्राचे नंदनवन करणाऱ्या विखे पाटील यांनी सर्व सामान्य शेतकऱ्याच्या व कष्टकऱ्याच्या खडतर जीवनमानाला पत व अर्थ प्राप्त करून दिला.

### ३.२.३ सहकार क्षेत्रातील कार्य :

विठ्ठलराव विखे पाटील यांनी केलेल्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यानंतर त्यांनी 'सहकार' क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याचा परामर्श घेणे महत्त्वाचे वाटते. कृषी आणि सहकार क्षेत्रातून प्रवरानगर परिसरात समृद्धीचे नंदनवन उभे केले. खिशात चटणी-भाकरीचं गाठूडं बांधून 'सहकार' क्षेत्राच्या विकासासाठी आणि उचित ध्येयपूर्तीसाठी आयुष्याची चाळीस वर्षे विखेपाटील यांनी घालविली. लोणी बुद्रुक परिसरात विखेंच्या काळात अज्ञान, दारिद्रय, अंधश्रद्धा या गोष्टींचे प्राबल्य दिसून येते. व्यापारी, सावकार गोर-गरीब शेतकऱ्यांचा अज्ञानाचा फायदा घेऊन कर्जाचे अमिष दाखवून लबाडणूक करीत होते. या सगळ्या गोष्टी संवेदनशील असणाऱ्या विखेपाटील यांनी पाहिल्या. या गोरगरिब शेतकऱ्याना सावकारी पाशातून सोडविण्यासाठी १९२३ मध्ये 'लोणी बु द्रुक सहकारी पतपेठी'ची स्थापना केली. 'सहकार' क्षेत्रातील जीवनकार्याचा त्यांनी श्री गणेशा केला. त्यानंतर लोणी बुद्रुकच्या परिसरात अशा प्रत्येक गावात पतपेठ्या काढून सर्वसामान्य माणसाला 'पत' मिळवून दिली. गावोगाव 'सहकार' म्हणजे काय पैशाची बचत कशी करावी याबद्दल विखेपाटील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करू लागले. 'सहकार' याबद्दल सर्वसामान्य शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना विखेपाटील सांगतात,

''बाकी कायबी करा, पर सहकाराची, एकमेकाची कास धरल्याबिगर नाही लागायची तड इथनं म्होरं तुमची, तुम्हा साऱ्यांना ह्यो बोल 'सहकार' कानाला नवा वाटतो, बुद्धीला पचायला अवघड जातो. सहकार म्हणजे सावकार न्वहं, आपणां साऱ्यांची ऐपत सुधारायची असंल, तर हर एक शेतकऱ्यानं समद्या शेतकऱ्यासाठी आणि समद्यांनी मिळनू आता हर एक शेतकऱ्यासाठी झटायलाच पाहिजे.''[२] असे सहकारबद्दल विखेंचे मत होते. सगळ्या शेतकऱ्यानी मिळूनच काटकसरीची सवय लावून घेतली पाहिजे. गावोगाव सहकारी पतपेढ्या काढून कष्टकरी नशापाण्याच्या व्यसनात डुबणाऱ्या शेतकऱ्यांना सहकार पतपेढीचा खरा अर्थ सांगून विखेपाटील यांनी त्याचे जीवनमान उंचावले. शेतकऱ्याना बचतीची सवय लावली. विखेपाटील यांना 'सहकार'चा अर्थ कळला होता. ते कोणत्याही अधिकाऱ्यासमोर सडेतोड बोलत

असत. संगमनेरमधील 'सहकार दिन' निमित्त बोलताना त्यावेळचे जिल्हाधिकारी संभाजीराव घाटगे यांनी 'सहकाराचा पांढरा हत्ती' कशासाठी पोसायचा ? असा प्रश्न केला होता. त्यावर विखे पाटील यांनी 'श्यायब, बारशाला येऊन तेराव्याचं जेवण जेवायची सवय नाही आम्हा मराठमोठ्या माणसांस्नी. आज 'सहकार दिन' आहे. सहकारातील खराब वंगाळ बाजूला सारून मुळचा विचार आम्ही वधारूनच चालवू.' (पृष्ठ २३१) विठ्ठलराव असे अधिकाऱ्यांच्यावर सडेतोड बोलत असत. पुढे घाटगे कलेक्टर यांनी सहकाराकडे डोळे उघडे ठेऊन बघण्याची स्वच्छ व साफ दृष्टी विखेपाटीलांनी मला दिली अशी कबूली देतात. मुंबई इलाखा सहकारी बँकेच्या मार्फतही गोरगरीब शेतकऱ्यांची कामे विखेपाटील यांनी केली आहेत. १७ डिसेंबर, १९४५ रोजी 'बेलापूर बागाईतदार परिषद' घेतली. या परिषदेला परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी जमले होते. विठ्ठलरावांच्या आयुष्यातील कलाटणी देणारा हा ऐतिहासिक दिवस होता. या परिषदेला अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ मार्गदर्शन करतात. याच परिषदेमध्ये सहकारी साखर कारखाना काढण्याचा निर्णय होतो. यासाठी 'दि बागाईतदार को-ऑप शुगर प्रोड्युसर्स सोसायटी लिमिटेड लोणी बु।।' याची स्थापना करण्यात येते. याची चेअरमन पदाची जबाबदारी धनंजयराव गाडगीळ याना दिली जाते तर लिखावटीच्या कामासाठी शंकरराव तांबवेकराना बोलावून घेतात. तर सोसायटीच्या रजिस्ट्रेशनसाठी यशवंतराव टेकावडे व सखा हरि भोसले यांच्या मदतीने ताबडतोब दोन लाख रूपये बँकेत भरतात. या परिषदेच्या दिवसापासून विठ्ठलरावांच्या जीवनाला प्रचंड कलाटणी मिळाली. त्यांच्यासमोर आव्हान ते गोर-गरिब शेतकऱ्याकडून कारखान्यासाठी २५ लाख रूपयाचे भागभांडवल उभा करण्याचे, हे भागभांडवल जमविताना परिसरतील अशिक्षित स्त्रीयांनी आपल्या हाता-गळ्यातील दागिने विठ्ठलरावांना 'पाठचा भाऊ' मानून निर्धास्तपणे त्यांच्या ओंजळीत ठेवले. शेतकऱ्यांचा स्वतंत्र सहकारी साखर कारखाना उठविण्याच्या या मोहिमेवर त्याना चांगले अनुभव आले. तसे जीवघेणे कटू अनुभवही आले. श्रीरामपूरच्या भरल्या व्यापारपेठेत व्यापाऱ्यांच्या खोड्याळ पोरांनी 'लोणीचं येडं पाटील' म्हणून हेटाळणी करत खडेही मारले. पण विठ्ठलराव डगमगले नाहीत. डॉ.धनंजयराव गाडगीळ यांच्या आग्रहामुळे या कारखान्याचे 'उपाध्यक्षपद' त्यांना स्वीकारावे लागते. कष्टाने भागभांडवल जमवून विठ्ठलरावांनी झेकोस्लाव्हकियात तयार झालेली 'स्कोडा' नावाची साखर गाळणारी अद्ययावत मशिनरी लोणी बुद्रुकच्या 'भुताच्या माळावर

आणली.' १७ जून, १९५० रोजी उद्योग व मजूर मंत्री ना.मालोजीराजे निंबाळकर यांच्या हस्ते आशिया खंडातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याचा कोनशिला समारंभ लोणी बुद्रुकच्या 'भुताच्या माळावर' संपन्न झाला. या काळात विठ्ठलरावांना अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ वैकुंठभाई मेहता, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. १९५० साली पहिल्या गळीत हंगामाची तपशिलवार माहिती सावंत या चरितकहाणीत देतात. कारखान्याचे ऊस लागवडी क्षेत्र ७६६ एकर. ३३,०५५ टन ऊस गाळप करून त्याची ३७,५०१ पोती २८ 'डी' ही पहिल्या प्रतीची साखर निघाली. साखरेचा उतारा १२.०२ प्रतिशत तर सरासरी उतारा ११.४९ प्रतिशत इतका मिळाल्याची माहिती या चरितकहाणीत येते. विठ्ठलरावांनी सर्वात महत्त्वाचे सहकाराचे तीन पायंडे पाडले. १) सभासद नसलेल्या २० बिगर शेतकऱ्यांचा ५७६ टन ऊस केवळ सहकार्याच्या भावनेने गाळून दिला. २) कारखान्याच्या कोणत्याही सभासदाला ऊस लागवडीखाली जास्तीत जास्त २५ एकर क्षेत्र आणता येईल असा संकेत सर्वांनी मान्य केला. ३) पहिल्याच वर्षी कारखान्याने शेती सुधारणेसाठी 'शेती सुधारणा' निधी चालू करून एक आदर्श व दूरदृष्टीच्या सकस सहकारी पद्धतीचा पहिला पाया रोवला. १३ एप्रिल, १९५४ चा 'सहकार सुवर्ण महोत्सव' चा कार्यक्रम असो किंवा यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत कोल्हापूरातील पन्हाळा येथे भरलेल्या 'महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी परिषद' असो यात विठ्ठलरावानी सक्रीय सहभाग घेतला. अखिल भारतीय सहकारी साखर कारखान्याची पहिली परिषद विठ्ठलरावांनी प्रवरा सहकारी साखर कारखान्यात भरवून साखर कारखान्याच्या चळवळीचा आढावा, येणाऱ्या अडचणी, ऊस विकणारे सभासद, कारखान्यात काम करणारे कामगार यांनी एकमेकांशी कुठल्या जबाबदारीच्या जाणिवेनं वागावं अशा स्वरूपाचा विचार या परिषदेत मांडला गेला. देशातील इतर सहकारी संस्थाना ही परिषद फलदायी ठरली याचे श्रेय विठ्ठलराव यांच्याकडेच जाते. सहकारी क्षेत्रातील विठ्ठलरावांनी केलेले कार्य उल्लेखनिय आहे. आशिया खंडातील पहिला साखर कारखाना त्यांच्या जिद्दी स्वभावामुळे १९५० साली पूर्ण झाला. पण त्याचे उद्घाटन त्यांनी १० वर्षे थांबविले होते. देशातील पहिल्याच शेतकऱ्यांच्या साखर कारखान्याचे उद्घाटन देशाच्या पहिल्याच पंतप्रधानाने करावे हा त्यांचा आग्रह होता. यशवंतराव चव्हाण यांनी दिलेल्या शब्दामुळे पंडित जवाहरलाल नेहरू यांना लोणी

बुद्रुकमध्ये उद्घाटनासाठी आणले. त्यांनी आपल्या शुभहस्ते कारखान्याचे रीतसर उद्घाटन केले.

देशाच्या पहिल्या पंतप्रधानाने आशिया खंडातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याचे उद्घाटन केले ही घटना देशाच्या दृष्टीने सहकारातील पहिले पाऊलच होते. यावेळी पं. नेहरू यांनी केलेले हिंदी भाषेतील भाषण लढतमध्ये मराठीत उद्धृत केले आहे. पंडित नेहरू म्हणतात, ''विद्वान व श्रीमंत अशी मोठी माणसं मोठे कार्य करतात, हे मला माहित आहे. परंतु कमी शिकलेली, लहान माणसदेखील मोठे कार्य करू शकतात हे मला आज कळलं. विखे पाटीलसारखा एक सामान्य शेतकरी केवढं मोठे कार्य करू शकतो, हे मी आज पाहिलं. खरोखरच, आज देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अशाच राष्ट्रभक्तीची गरज आहे. विखे पाटील हे त्या अर्थानं खरे देशभक्त आहेत. त्याचं कार्य पाहून मी अक्षरश: थक्क झालो आहे. देशात गाजावाजा न करता असामान्य प्रतीचं काम करणारे शेतकरी आहेत ही गोष्ट माझ्या मनात रूजली. आजपर्यंत बाराफूट उंचीचा ऊस मी कधी पाहिलाही नव्हता. आज तो पाहिला. नव्या शोधाचा व नव्या शास्त्राचा उपयोग करून महाराष्ट्रातील शेतकरी सहकारी पद्धतीनं शेती व उद्योगधंदे कार्यक्षमतेने करू शकतो. अशी माझी खात्री झाली आहे. सामान्य शेतकरी माणसं सहकार व संघटना या बळावर ग्रामीण भागात केवढी मोठी कारखानदारी उभी करून ती चालवू शकतात हे मी पहात आहे. देशात आता मी जिथं जाईन, तिथं तिथं आठवण ठेऊन लोकांना सांगेन की आपण प्रवरानगरला जरूर भेट द्या. तेथील कार्यपद्धती बघा व सर्वसामान्य माणसं किती विशाल कार्य करू शकतात याचं प्रत्यंतर घ्या. प्रवरानगरच्या उदाहरणावरून अनुभव घेऊन देशाचं चित्र बदलून टाका !'' (पृष्ठ ३४०) शून्यातून अंगभूत शहानपणानं अपार परिश्रमानं भारतीय शेतकऱ्यांच्या सहकार, आर्थिक आघाडीसाठी 'लढत' देणाऱ्या विठ्ठलरावांनी सहकार क्षेत्रात महत्त्वाचे कार्य केले.

### ३.२.४ शैक्षणिक कार्य :

विठ्ठलराव विखे पाटील यांनी कृषी आणि सहकार क्षेत्राबरोबरच शैक्षणिक कार्यातही उल्लेखनिय कार्य केले आहे. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मदतीने विठ्ठलरावानी 'लोणीत' महात्मा गांधी विद्यालय ही शाळा काढली. या परिसरातील लोकांना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या अनुभवी व व्यवहारी भाषेत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. रयतचा विद्यार्थी नुसता

पुस्तकी पढीक शिक्षण घेणारा पोपट होता कामा नये, तो स्वावलंबी व खंदा नागरिक झाला पाहिजे, आपल्या स्वतःच्या सामर्थ्यावर उभा राहिला पाहिजे या विचारातूनच पुढे विठ्ठलराव विखे पाटील यांनी सातारा, आष्टा येथील रयतच्या शिक्षण संस्थेना भेटी देऊन आपल्या परिसरात महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, प्रवरानगर, न्यू इंग्लिश स्कूल, सात्रळ, न्यू इंग्लिश स्कूल, कोल्हार बुद्रुक, आश्वी इंग्लिश स्कूल, आश्वी या शाळा रयत संस्थेमार्फत प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात स्थापन केल्या. बहुजनसमाजासाठी शिक्षण क्षेत्रात बहुमोल कामगिरी करणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याच्या सुवर्णमहोत्सवी निधीसाठी प्रवरा साखर कारखान्यातून सव्वीस हजार रूपये तर नगर परिसरातून एक लाख रूपये निधी जमा करून विठ्ठलरावांनी दिला. याबरोबरच रयत शिक्षण संस्थेच्या शिक्षण कार्यासाठी प्रवरा साखर कारखान्याच्यावतीने टनामागे पंचवीस पैसे असा 'शिक्षण फंड' म्हणून दिला. अशा शिक्षण क्षेत्रातील कार्याबरोबरच विठ्ठलरावानी उद्याची पिढी म्हणून येणाऱ्या बालकांवरही लक्ष दिले. त्यासाठी त्यांनी लोणी येथे 'बालशिक्षण मंदिर' काढले. त्याची धुरा सौ. परांजपे यांच्यावर सोपविली. मुलांच्यावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून विठ्ठलरावांनी तुकाराम महाराज व शिवाजी महाराज यांच्या चरित्राच्या एकहजार प्रती खरेदी करून नगर भागातील गोवागावांच्या मुलांसाठी शिक्षण संस्थाना पुरविल्या. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याच संस्कारामुळे विठ्ठलरावांच्या मनातही शिक्षणाबद्दल तळमळ होती.

महाराष्ट्रभर शिक्षणाचे कार्य करणाऱ्या 'रयत शिक्षण संस्थेचे' (१९७८) उपाध्यक्ष म्हणून विठ्ठलरावांनी आपले शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वाचे पद सांभाळले. या कार्यकालात यशवंतराव चव्हाण 'रयतेचे अध्यक्ष' म्हणून संस्थेचे काम पहात होते. विठ्ठलरावांनी 'रयतच्या' शिक्षण संस्थेबरोबरच आपल्या परिसरात प्रवरा एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेची स्थापना केली. प्रवरा-परिसरात विविध शैक्षणिक संस्थेचे जाळे उभा केले. यामध्ये प्रवरा पब्लिक स्कूल, प्रवरानगर, प्रवरा कन्या विद्या मंदिर, पद्मश्री विखे पाटील कॉलेज आर्टस्, सायन्स,कॉमर्स प्रवरानगर, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन, आश्वी खुर्द, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, वाघरे बुद्रुक, श्री यशंवतराव चव्हाण विद्यालय, राजुरी, महात्मा फुले विद्यालय दाढ बुद्रुक, प्रवरानगर विद्यानिकेतन, फत्याबाद, प्रगती विद्यालय, चिंचोली, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील विद्यालय, बाभळेश्वर, संत मुकुंददास इंग्लिश मीडियम

स्कूल,दाढ बुद्रुक. प्रवरा इंग्लिश मीडियम स्कूल पाथरे बुद्रुक, इंग्लिश मीडियम स्कूल, लोणी बुद्रुक, प्रवरा मीडियम स्कूल, (कोल्हार), भगवतीपूर, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील इंजिनिअरिंग कॉलेज, प्रवरानगर, या संस्थाशिवाय पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅण्ड इंजिनिअरिंग या तांत्रिक विभागातर्फे मुलांचे आणि मुलींचे असे वेगवेगळे पॉलिटेक्निक कॉलेजही काढले.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी बहुजनाच्या शिक्षणासाठी अशाा विविध प्रकारचे शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्या. प्रवरानगर व परिसर एक शैक्षणिक केंद्र म्हणूनच उदयास आणले. हे सर्व शैक्षणिक कार्य आपल्या सततच्या धावपळीने व तळमळीने विठ्ठलराव पाटील यांनी केले. स्वत: अल्पशिक्षित असताना सुद्धा 'शिक्षण' क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला. 'लढत' चरितकहाणीत सावंत यांनी त्यांच्या शैक्षणिक संस्थांची यादीच दिली आहे. विठ्ठलरावांचे शैक्षणिक कार्य उल्लेखनिय आहे. महाराष्ट्रामध्ये बहुजन समाजासाठी ज्या ज्या शिक्षणसंस्था स्थापन झाल्या त्यामध्ये विठ्ठलरावांच्या शिक्षणसंस्थाचे नांव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

### ३.२.५ सामाजिक कार्य :

कृषी आणि सहकार क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या विठ्ठलराव विखे पाटील यांनी सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. लग्नसमारंभामधील हुंडा पद्धत, त्यासाठी कर्ज, त्यामुळे होणारे गावोगावच्या शेतीचे लिलाव या प्रथा विखे पाटील यांनी बंद केल्या. समाजात जीव गेला तरी जपली जाणारी जात-पात विखे पाटील यांनी कधी मानली नाही. संत गाडगे बाबांच्या सोबत विखे पाटील यांनी कांही दिवस घालविले. त्यांच्या किर्तनात अनेकवेळा विखेपाटील यांनी ऐकलेला बोध याप्रमाणे 'बापहो, लहान मोठे कोन असत्ये, भौ ? कौन छूत ? कोन अछूत ? कोन म्हारं ? कोन मांग ? सम्दे मनाचे तारखेळ.'[३] (पृष्ठ ११) या गाडगेबाबांच्या किर्तनाचा विचारांचा प्रभाव विखे पाटील यांच्यावर झालेला दिसून येतो. यासाठी त्यांनी एक निर्णय घेतला. लोणीच्या रस्त्यालगतच्या बुवा हॉटेलात सर्व महार, मांग, चांभार, रामोशी वाडीतल्या लोणीकरांच्या समवेत चहा घेण्याचा निर्णय घेतला. सर्व गावकरी जातपात विसरून लोणी गावात आनंदाने राहू लागले. संत गाडगेबाबा, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा पगडा विखे पाटील यांच्यावर पडलेला दिसून येतो. सौ. हिराबाई भापकर या स्त्रीला नगर इलाख्याच्या 'डी.एल.बी.'चे अध्यक्ष करतात. तर शाहू मोडक सारख्या कलावंताचे कौतुक

करतात. असे त्यांच्या सामाजिक कार्याचे वेगवेगळे पैलू दिसून येतात. दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा यातून गोर-गरिब शेतकऱ्यांना मुक्तकरण्याचे महत्त्वाचे कार्य विठ्ठलराव विखे पाटील यांनी केले. या काळात अंध धर्मश्रद्धा, कर्मकांड व भोळ्या समजुती यांच्या घनदाट अंधकारात व गुलामीत उभा महाराष्ट्र वावरत होता. केशवराव ठाकरे यांचे 'प्रबोधन' साप्ताहिक पुण्यातील श्रीपतराव शिंदे यांचे 'विजयी मराठा' पत्र, बडोद्याचे भगवंतराव पाळेकर यांचे 'जागृती' पत्र, कोल्हापूरचे 'भगवाझेंडा', 'तरूण मराठा' ही पत्रे बालचंद कोठारीचे 'जागरूक' पत्र, बेळगावचा राष्ट्रवीर ही समाजप्रबोधन करणारी वृत्तपत्रे या काळात सुरू झाली. याचाही उल्लेख 'लढत'मध्ये सावंत करतात. दूरदृष्टीने साखर कारखान्याच्या इतिहासात १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाचे ध्वजारोहण त्यांनीएका झाडूवाल्या सेवकांच्या हस्ते संपन्न केले. विठ्ठलरावांनी एक क्रांतिकारक पायंडा पाडला. विखे पाटील यांच्या समाजकार्यावर नकळत याचाही प्रभाव असल्याचे वाटते.

### ३.२.६ राजकीय सहभाग :

कृषी, सहकार, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करून प्रवरानगर परिसराचे नंदनवन करणारे विठ्ठलराव विखे पाटील राजकारणामध्ये फारसे रमले नाहीत. राजकारणाचा उपयोग समाजकारणासाठी करून घेतला. 'लढत'मध्ये संक्षिपाने सावंत यांनी त्यांच्या राजकीय कार्याचे उल्लेख केलेले आहेत. डी.एल.बी. (जिल्हा लोकल बोर्ड) (१९२८) च्या निवडणुकीत विठ्ठलराव वयाच्या ३३ वर्षी निवडून येतात. नगर जिल्ह्याच्या अधिक व्यापक दृष्टीने आणि खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे क्रियाशील नेतृत्त्व ते करीत होते. या निवडणूकीनंतर कुठल्याही निवडणुकीसाठी ते कधी उभे राहिले नाहीत. त्यांनी ब्राह्मणेतर चळवळ व सत्यशोधक समाज यामध्ये सक्रीय सहभाग घेतला. प्रवरानगर परिसरातील अनेक संस्थांची जबाबदारी लोकांच्या आग्रहास्तव त्यांच्याकडे आली. त्यामध्ये अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्याय आग्रहाने 'दि बागाईतदार को-ऑपरेटिव्ह शुगर प्रोड्युसर्स सोसायटीचे उपाध्यक्षपद, प्रवरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष व पुढे अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. अत्यंत निष्ठेने या सगळ्या जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या असे दिसून येते. राजकारणामध्ये यशवंतराव चव्हाण, डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंटभाई मेहता, शंकरराव चव्हाण यांचा उपयोग विठ्ठलरावानी सहकारी संस्था व समाज कार्यासाठी करून घेतला.'

१९५७ च्या महाराष्ट्रातील द्विभाषिकाचा प्रश्न समोर ठेऊन संयुक्त महाराष्ट्र समिती व कॉंग्रेस यांच्यात गाजलेल्या लोकसभेच्या निवडणूकीत विठ्ठलरावानी नगर मतदार संघात सहकाराच्या कामात साथ करणाऱ्या कॉंग्रेसच्या कानवडे पाटील यांना विरोध करून समितीच्या बी.सी. कांबळे व खाडिलकर यांना पाठिंबा देऊन प्रचार दौऱ्यात सहभाग घेतला. समितीचे उमेदवार निवडूण आणले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला. देशातील तत्कालीन राजकारण व घटनांची नोंदीही सावंतांनी 'लढत' या चरितकहाणीत दिल्या आहेत. महात्मा गांधीपासून ते कोल्हापूरच्या माधवराव बागल यांच्यापर्यंतच्या या काळातील परिस्थितीचा एक राजकीय इतिहास सावंतानी लढतमध्ये शब्दबद्ध केला आहे.

**सारांश :**

विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जीवनाचा वेध आपण घेतला. त्यांच्या कर्तृत्ववान जीवनवृत्तांचा वेध घेताना विखे पाटील यांनी कृषी, सहकार, शिक्षण, राजकारण, समाजकारण या क्षेत्रात त्यांनी उल्लेखनिय कार्य करून प्रवरानगर परिसराचे नंदनवन केले. याचा परामर्श घेतला. विठ्ठलराव विखे पाटील हा केंद्रबिंदू धरून त्यांच्या जन्मापासून घडलेल्या सालवार घटना सावंतानी या चरितकहाणीत शब्दबद्ध केल्या आहेत. याबरोबरच तत्कालीन महाराष्ट्र, ग्रामीण संस्कृती, व्यवहार, शेतीपरिषद, कृषिविकास, सहकार चळवळ, तत्कालीन क्षेत्रातील सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी या ठळक विषयावर केलेले भाष्य तत्कालीन वर्तमान उभा करणारे आहे. सावंताच्या इतर कादंबऱ्यामध्ये इतिहासातून व्यक्ती उभी राहते. इथे विठ्ठलराव विखे पाटील उभे करताना व्यक्तीतून इतिहास उभा करतात. एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले विठ्ठलराव विखे पाटील आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर कृषिक्षेत्रात महान क्रांती घावितात. प्रवरा सहकारी साखर कारखाना या नावाने आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना उभा करतात. ही अभिमानाची गोष्ट आहे. १५ मे, १९६१ या दिवशी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या शुभहस्ते कारखान्याचे उद्‌घाटन झाले. विठ्ठलरावांनी शून्यातून निर्माण केलेल्या प्रचंड कार्याचे नेहरूनी तोंड भरून कौतुक केल्याचा वृत्तातही सावंतानी शब्दबद्ध केला आहे. विखे पाटील यांच्या जीवनाचा वेध घेताना सावंतानी 'लढत' मध्ये भारताचे स्वातंत्र्य, प्रजासत्ताक दिन, शेतकरी कामगार पक्षाची स्थापना, सत्यशोधक समाजाचे अधिवेशन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, दि बागाईतदार को-ऑफ शुगर प्रोड्युसर्स

सोसायटी लिमिटेडची स्थापना यासारख्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घटनांच्या नोंदीमुळे ही चरितकहाणी एकीकडे विखे पाटलांचे वैयक्तिक चरित्र आणि दुसरीकडे तत्कालीन सार्वजनिक परिस्थिती आणि तिचा विकासावर होणारा परिणाम अशा समांतर रेषेत पुढे सरकते. विखे पाटील भागवत पंथाच्या विचारांचे होते. पोथी पठन दररोज ते करत होते. मात्र त्यांनी आपले क्रियाशील निर्माण कार्य कधीच पोथीबंद होऊ दिले नाही. त्यांनी सततच्या धावपळीने व तळमळीने 'श्रमाची पोथी' निर्माण करून दाखविली. व्यक्तिच्या जीवनाला प्राप्त झालेला व्यापक सामाजिक आयाम सावंतानी व्यक्त केला आहे. ध्येयपूर्तीसाठी झगडणारा, शेती व शेतकऱ्यावर प्रेम करणारा, शिक्षणाची आच असणारा, निरक्षर गोर-गरिबांच्या विकासाचा ध्यास घेणारा, विघातक अंधश्रद्धाविरूद्ध बंड करणारा एक सक्रीय कार्यकर्ता हे विखे पाटलांच्या व्यक्तित्त्वाचे काही पैलू 'लढत'मध्ये प्रकर्षाने दिसून येतात.

विखे पाटील यांना त्यांच्या स्वीकृत कार्यात संत गाडगे महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंटभाई मेहता यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. त्याचा निर्देशही 'लढत'मध्ये केला आहे. जीवन एक झुंज समजून जीवनभर लढणाऱ्या एका पुरूषाची ती 'गाथा' आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात बोलल्या जाणाऱ्या मराठी ढंगातील भाषा सावंतानी या चरितकहाणीसाठी निवडली आहे. हे 'लढत'चे एक वैशिष्ट्य आहे. 'धावणी' हा शब्द विखे पाटील यांच्या एकूण कार्यासंदर्भात वापरला आहे.

'लढत'मधील विखे पाटील स्वत:ची कहाणी स्वत:च सांगतो आहे. तो व्यासपीठावरती बसलेला आहे. स्वत:शी अंतर्मूख होऊन स्वत:शीच तो आपल्या गतजीवनाच्या स्मृती आठवतो आहे की समोरच्या जनसमूदायाला तो आपली जीवनगाथा सांगतो आहे हे या 'चरितकहाणी'तून स्पष्ट होत नाही. या चरित कहाणीतून वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा अभाव दिसून येतो. 'लढत या चरितकहाणीच्या अभ्यासानंतर 'संघर्ष' या चरितकहाणीचा विवेचनात्मक अभ्यासाचा वेध घेऊ.'

## ३.३ 'संघर्ष' (१९९५)

'संघर्ष ' ही भाई मनोहर कोतवाल या ज्येष्ठ माथाडी कामगार नेत्याची १९९५ साली प्रसिद्ध झालेली चरितकहाणी आहे. माथाडी कामगारासाठी लढणारा माणूस 'संघर्ष'चा नायक आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत प्रारंभीच कोतवाल यांच्यावर का लिहावेसे वाटले हे सावंतानी स्पष्ट केले आहे. पुण्याच्या शिवाजीनगर स्थानकावर

सावंत उतरले असताना 'लाल बावटे की जय', 'कोतवालसाहेब जिंदाबाद' अशा घोषणा लेखकाच्या कानावर पडतात. माथाडीना माणशी ३० ते ४० हजार रूपये पगार वाढीचा फरक मिळवून देणोर कोतवाल साहेब कोण ? अशी 'ठिणगी' सावंतांच्या मनात पडते आणि 'संघर्ष' चा प्रवास सुरू होतो. प्रस्तुत चरितकहाणीत भाई मनोहर कोतवाल यांचे १९१५ ते १९९० पर्यंतचे केवळ जीवनचरित्र नसून कामगार चळवळीचा इतिहास, कामगार चळवळ, त्या क्षेत्रातील नेते, राजकीय आणि सामाजिक उलथापालथ यांचेही चित्रण सावंतानी केले आहे. भाई मनोहर कोतवाल यांचे व्यक्तिमत्त्व, कामगार, सामाजिक, राजकीय इ. क्षेत्रातील त्यांचे कार्य या दृष्टीने 'संघर्ष' या चरितकहाणीचा वेध घेणार आहोत. या चरितकाणीत कोतवालाच्या प्रत्येक कार्याच्या विभागाला सावंत यांनी गोण पहिली, गोण दुसरी अशी नावे दिली आहेत. विभागाना दिलेले 'गोण' हे शीर्षक माथाडी कामगारांच्या कष्टप्रद जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन घडविते. अशा सोळा भागातून या चरितकहाणीचा वेध घेतला आहे. प्रारंभी भाई मनोहर कोतवाल यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परामर्श घेऊ.

### ३.३.१ भाई मनोहर कोतवाल यांचे व्यक्तिमत्त्व :

मनोहर उर्फ दत्तात्रेय गोपीनाथ कोतवाल यांचा जन्म धुळे येथे (खानदेश) ४ डिसेंबर १९१५ साली झाला. वडिलांचे नाव गोपीनाथ तर आईचे नाव सरस्वतीबाई, भाऊ विनायक असे भाई मनोहर कोतवाल यांचे कुटुंब.

वडिल गोपीनाथ व्यवसायाने वकील होते. आई सरस्वतीबाई अतिशय प्रेमळ, धार्मिक, स्वाभिमानी व कष्टाळू होती. आपल्या विनायक व मनोहर या दोन्ही मुलांचे जीवन संस्कारानी परिपूर्ण कसे होईल याकडे लक्ष देत होती. कोतवाल कुटुंब मुळचे ठाण्याचे होते. अकोला या ठिकाणी मनोहरच्या वडिलानी वकिली व्यवसाय सुरू केला. तरी त्याला 'धंद्याचे रूप' कधी येऊ दिले नाही. अनेक गरिबांचे कोर्टातील खटले त्यांनी फी न घेता मोफत चालविले. आई-वडिलांचे हे संस्कार मनोहरच्या मनात खोलवर रूजले होते. मनोहरचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण अकोला येथील म्युनिसिपालटीच्या शाळेत झाले. शाळेत असताना 'युनियन जॅक' या ब्रिटिशांच्या ध्वजाला मानवंदना द्यायची होती. परंतु देशाभिमान असणाऱ्या 'मनू'ने मानवंदना द्यायची नाही. "द्यायचीच झालीतर ती देशाच्या स्वातंत्र्याचे प्रतीक असलेल्या फक्त तिरंग्यालाच द्यायची" (पृष्ठ २५) अशी त्यांची वृत्ती. किशोर वयातील अर्धी खाकी पॅन्ट व खादीचा शर्ट या वेशातील मनू कोतवाल हाताच्या मुठी वळवून भाषण देताना

तावातावाने म्हणतो, “आपल्या देशातील गाईच्या कासेला चिकटलेले गोरे गोचीड निर्धाराने उपटूनसातसमुद्रापार फेकून द्या ! जोपर्यंत या देशात गोरासाहेब व युनियन जॅक आहे तोपर्यंत देशातील बांधवाना कधीच सुख मिळणार नाही. यांचे तोंड गोरगरिबांचे रक्त पिऊन लालेलाल झाले आहे. अरे तेहतीस कोटी सिंहाना तीन लाख दडपितो कोल्हा. हा काय न्याय झाला ?”[४] या शाळेतील भाषणाने ‘मनू’ चा गौरवशाली मनोहर कोतवाल झाला. किशोरवयातच मनोहरच्या मनात स्वातंत्र्यप्रेमाची जाणीव निर्माण झाली. खेड्यापाड्यात फिरून गांधीजींच्या असहकाराचा संदेश मनोहर आपल्या सोबत्यासह देऊ लागला. संवेदनशील व सहकारी मनोहरचे मन स्वातंत्र्याच्या ओढीने भरून गेले. १९३३ साली मनोहर अकोला केंद्रातून मॅट्रिकची परीक्षा पास झाला. त्यानंतरचे व महाविद्यालयीन शिक्षणासाठी हेस्लॉप कॉलेज, नागपूर या महाविद्यालयीत बी.ए. प्रथमवर्षात प्रवेश घेतला. पण मनोहरने नाशिकमध्ये असणाऱ्या सदामामांच्याकडे जाण्याचा निर्णण घेतला. नागपूरातील महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडून नाशिकच्या एच.पी.टी. कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. या कॉलेजमध्ये बी.ए. ची पदवी संपादन करून मनोहर कोतवालानी पदव्युत्तर शिक्षणासाठी मुंबई विद्यापीठात दाखल झाले.

मुंबई विद्यापीठातून पदव्युत्तर (एम.ए.) शिक्षण घेत असताना दादरमधील किंग जार्ज हायस्कुलात रजेच्या काळात शिक्षकाची नोकरी त्यांनी केली. त्यांनतर मुंबईमध्ये सेंट्रल बोर्डात सबइन्स्पेक्टर म्हणून कोतवालानी काम केले. पण ध्येयवादी मनोहर कोतवालांचे मन या नोकरीत रमले नाही. त्यांनी या नोकरीचा राजीनामा दिला. या काळात देशातील म.गांधी, नेहरू, बोस या वेगवेगळ्या नेत्यांची देश स्वातंत्र्यासाठी आंदोलने चालू होंती. अखलि भारतीय गोदी कामगार संघाचे प्रणेते पी.डिमेलो, ना.म. जोशी या कामगार नेत्यांचा परिणाम कोतवालांच्यावर होऊ लागला. पूर्णवेळ कामगारांच्या कल्याणासाठी देऊ लागले. आई-वडिल, भाऊ विनायक यांच्या वारंवार ‘तू लग्न कधी करतोस’ या सांगण्यामुळे मनोहर कोतवाल यांनी सचिवालयात नोकरी करीत असणारी गुलाब प्रधान या मुलीशी १९ मार्च, १०५० साली नोंदणीकृत पद्धतीने विवाह करून समाजासमोर एक आदर्श ठेवला. सौ. गुलाब मनोहर कोतवाल यांनी आपला संसार जिद्दीने केला.

बालपणी डोळ्यात कांद्याचारस गेला म्हणून डोळ्यावर हात ठेवणारा मनोहर, नववीत विंचवाने डंख दिला म्हणून वर्गात थयथयाट करणारे आणि युनियन जॅकला

मानवंदनेसाठी ताठ मानेने नकार देणारे मनोहर महाविद्यालयीन जीवनात शेक्सपिअरची ऑथेल्लो, मॅकबेथ अशी नाटके तोंडपाठ करणारे आणि मॅन ऑफ डेस्टिनी नाटकात नेपोलियनची भूमिका करणारे, मनोहर कोतवाल अशी रूपे दिसून येतात. शं.दा. पेंडसे, पु.भा.भावे, कॉ. रामभाऊ रूईकर, एम.एन. रॉय, गाडगेबाबा अशा मान्यवरांना भेटून मनोहर कोतवाल यांनी जीवनाच्या शिदोरीसाठी त्यांचे शेलके विचार घेतले. धुळे, अकोला, नागपूर, नाशिक, मुंबई अशी जीवनाची वळणे घेत आलेले भाई मनोहर कोतवाल ध्येयवादी, प्रभावी, चौकस, रूबाबदार, प्रामाणिक, निधडे, कष्टाळू होते. समर्पित भावनेने कार्यरत राहणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

### ३.३.२ स्वातंत्र्य चळवळीसाठी योगदान :

मनोहर कोतवाल यांनी किशोरवयातच ब्रिटिशांच्या सत्तेविरूद्ध आंदोलनामध्ये सहभाग घेतला. गोऱ्या युनियन जॅकला मानवंदना नाकारून तिरंगा झेंड्याला मानवंदना द्यायची असा विचार मनोहर कोतवालांच्या मनात शालेयशिक्षणापासूनच रूजूला गेला. देश स्वतंत्र होण्यासाठी म. गांधीनी काढलेल्या 'दांडीयात्रा' मिठाचा सत्याग्रह, असहकार चळवळ यामध्ये सहभाग घेऊन स्वातंत्र्यगीते म्हणत होते. खेड्यापाड्यात जनजागरण करीत होते. भल्या पहाटे 'चरखा चला चलाके, लेंगे स्वराज लेंगे' स्वत:ला विसरून असा एकला चलोरे म्हणत निघालेल्या मनोहरला नंतर स्वातंत्र्यप्रेमी माणसांची साथ मिळाली. या काळात म. गांधीजींच्या आंदोलनाचा प्रभाव मनोहर कोतवाल यांच्यावर पडलेला दिसून येतो. गांधीजीनी सामान्य माणसाच्या जीवनातील मिठासारख्या क्षुल्लक पण रोजच्या जीवनावश्यक वस्तूला थोरपण देऊन भारतीयांची मने स्वातंत्र्यप्रेमाने पुरती चेतवली होती. गांधीजीनी मिठासारख्या नाचिज वस्तूला मोल दिले ही कोतवाल यांना मोठी क्रांती वाटते. देशातील पहिला अमरावती जिल्ह्यातील लोणी गावच्या 'जंगल सत्याग्रहात' विद्यार्थी दशेतच कोतवालानी सहभाग घेऊन 'जंगल का कायदा तोडनारे । लोणी की बंदी तोडना रे ।' अशी घोषणा देत लोणीच्या जंगलात घुसून सत्याग्रह केला. आपली सेंट्रल टी बोर्डातील सहकारी दिखाऊ नोकरी करीत असतानाच स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या भूमिगतांना पाठबळ दिले. मनापासून लहान-थोर स्वातंत्र्य सैनिकाला पडेल ती मदत करणे हे कोतवालांनी आपले आद्य कर्तव्य मानले. चहाच्या किटलीतून ब्रिटिशाच्या जहाजावर बॉम्ब नेऊन ठेवण्याचे कामही कोतवाल यांनी केले. परंतु त्या बॉम्बचा स्फोट झाला नाही. कारण नियतीनेच त्यांची निवड विधायक कर्तृत्वासाठी

केली होती. अशाप्रकारे मनोहर कोतवाल यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. या सहभागामुळे त्यांचे व्यक्तित्व संपन्न झाले. जीवननिष्ठा व जीवनधारणा देशाशी व देश बांधवाशी निबद्ध झाल्या. ते 'सत्याग्रही' बनले.

मुंबई येथील गिरणीकामगारासाठी भाई मनोहर कोतवाल यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेऊ.

### ३.३.३ मुंबई येथील गिरणी कामगारांच्यासाठी केलेले कार्य :

भाई मनोहर कोतवाल केवळ माथाडी कामगारांचे नेते नव्हते जिथे अन्याय होईल तिथे तिथे कोतवाल आपल्या अभ्यासू वृत्तीने न्याय देत होते. १ जानेवारी, १९८२ साली डॉ. दत्ता सामंत यांनी गिरणी कामगारासाठी प्रदीर्घ संप चालवून 'गिनीज बुकसाठी रेकॉर्ड' केल्यावर हजारो गिरणी कामगारांची वाताहत झाली. यानंतर महाराष्ट्राचे मा. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना गिरणी कामगारांच्या दुःस्थितीची अचूक माहिती मिळण्यासाठी आणि उपाय योजनेसाठी एक कमिटी नेमण्यात आली. त्या कमिटीचे अध्यक्ष मनोहर कोतवाल होते. कोतवाल यांनी कमिटीचे उत्तम काम केले. एकूण १ लाख ६ हजार ३५६ कामगार या संपामुळे बेकार झाले. ९ हजार २११ कामगार पोसणाऱ्या ३ गिरण्या पूर्ण बंद झाल्या. गिरणी कामगारासाठी पगार व ग्रॅच्युईटीची २७ कोटी रूपयाची थकबाकी २९ गिरण्यातील कामगारांच्या भविष्यासह निधीचे ४ कोटी ७५ लाख रूपये इतके कामगारांचे देणे गिरणी मालकांनी द्यावयाचे होते. ही वस्तुस्थिती कोतवाल समितीतने अधिकृत आकडेवारीसह उघड केली आणि खळबळ उडाली. कोतवालाचे वैशिष्ट्य असे की या अहवालावर गिरणी मालकांच्या प्रतिनिधीनेही मान्यतेसाठी सही दिली होती. आजही 'कोतवाल कमिटी' चा अहवाल प्रमाण मानला जातो. गिरणी कामगारांची देणी देण्यास सुरूवात झाली गिरणी कामगारांना थकबाकीचे ९ कोटी रूपये वाटले. आणखीन पैसे गिरणीकामगाराना मिळाले असते पण मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे मुख्यमंत्रीपद जाऊन ते दिल्लीला गेले. त्यानंतर गिरणी कामगारांना सरकारात कुणी वाली उरला नाही. ना. शंकरराव चव्हाण यांनी महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या रत्नागिरी येथील बैठकीत 'श्रीनिवास' गिरणीच्या राष्ट्रीयीकरणाचा ठरावही मंजूर केला होता. पण त्यांच्यानंतर महाराष्ट्र सरकारणे गिरण्यांच्या बिकट प्रश्नात गिरण्यांची जमीन विकायची इतकेच लक्ष घातले. मनोहर कोतवाल यांनी गिरणी कामगार यांच्यासाठी सत्यशोधनाचे काम करून आपला अहवाल तयार केला होता. यावरून लक्षात येते की, कोतवाल फक्त गोदी कामगार व

माथाडीचे नेते नाहीत ते देशातील विधायक, विश्वसनीय आणि विकासोन्मुख कामगार चळवळीचे नेते होते.

### ३.३.४ गोदी कामगार आणि माथाडी कामगारासाठी केलेले कार्य :

भाई मनोहर कोतवाल यांनी कुठेतरी गोदीत कधीतरी रस्त्यात, कधी डोक्यावरून अवजड गोण वाहताना गुदामातच आपला अखेरचा श्वास सोडलेल्या, ज्यांची कुठेच, कसलीही नोंद नाही अशा गोदी आणि माथाडी कामगारासाठी कार्य केले. २१ जानेवारी, १९४९ रोजी मुंबईच्या गोदीत सेक्रेटरी म्हणून सर्वप्रथम कामगारांचा व्यक्तिगत परिचय करून घेतला. गोदीत दोन हजार सभासद, त्यातील पंधराशेहे सर्व खात्यात काम करणारे कामगार होते. तर पाचशेहे निव्वळ माथाडी कामगार होते. 'माथाडी' या एकाच शब्दाने त्यांना खोलवर ढवळून काढले. त्यांच्या मनाला 'माथाडी' हा शब्दच खोलवर जाऊन भिडला. 'माथाडी' म्हणजे केवढे तरी अवजड ओझे दिवसभर आपल्या माथ्यावरून उन्हातान्हात वाहून नेणारा जीव ! केवढे कष्टमय आहे हे त्यांचे जीवन ! त्यासाठी त्याला मिळणारी परतफेड काय ? किती किती आहेत त्याचे प्रश्न ? गोदीत कायम होणे, त्यांची नोंद होणे, बोनस मिळणे, रजा-वैद्यकीय रजा, फंड, मुलांचे शिक्षण, राहण्यासाठी घर अशा अनेक प्रश्नांनी हा कामगार पिंजला होता. राजकीय नेतेही त्यांचे प्रश्न सोडवत नव्हते, कामगार नेत्याना तुरूंगात डांबून ठेवत होते. या कामगारांच्या समस्या प्रश्नांचा शोध घेऊन कोतवाल यांनी हुशारीने हे प्रश्न सोडविले. यासाठी कोतवालानी नाशिकच्या तुरुंगात असणाऱ्या डिमेलोंची प्रथम भेट घेतली आणि प्रत्यक्ष कामाला सुरूवात केली. प्रथम 'मुंबई मजदूर युनियन' या कामगार संघाची स्थापना करून कामगाराच्या मनातील अकारण आलेले भय निपटून काढले. कामगाराच्यात आत्मविश्वास निर्माण केला. कोतवाल यांनी नेते डिमेलो यांचाच उल्लेख करून त्यांना पुढील लढ्याचे अनेक विचार पटविले. "आज ना उद्या तुमचा नेता परतणार आहे. मी भरतासारखा फक्त तुमच्या कामगार संघाच्या पादुका काही काळ सांभाळण्यासाठी इथे आलो आहे. हे तुमच्यासमोर मी कोतवाल बोलतो आहे असे मानूच नका. हे डिमेलोच बोलत आहेत हे नीट ध्यानी घ्या."[५] (पृष्ठ १४६). कोतवाल कामगारांच्यासमोर असे सडेतोड व स्पष्टच बोलत होते. हंगामी कामगाराना 'युनियनचे' सभासद करून कायमचे केले. कामगारांच्या बोनससाठी चौदा दिवसाचा संप करून कामगारान बोनस मिळवून दिला. पी.डिमेलो यांचा लढा कोतवाल यांनी निष्ठेने तडीस नेला. मुंबई गोदी कामगार

महामंडळाची स्थापना १९५२ साली करून या महामंडळाद्वारे गोदी कामगारांना किमान वेतन मंजूर करून एकरकमी १ लाख २० हजार रूपये थकबाकी मिळवून दिली. हे गोदी कामगारासाठी कार्य करीत असताना चीन, रशिया, जपान, युरोप, इंग्लंड या देशातील कामगार संघटनांचा अभ्यास, तेथील प्रश्न याचाही सखोल अभ्यास भाई मनोहर कोतवाल यांनी प्रत्यक्ष त्या देशांचा दौरा करून केला. कामगारांच्यासाठी येरवडा तुरुंगात कोतवाल यांनी शिक्षा भोगली.

पंतप्रधान पंडित जवाहर नेहरूच्या समोर संपूर्ण देशातील गोदी कामगारांचे भवितव्य ठरविणाऱ्या बैठकीमध्ये अतिशय समर्पकपणे, समतोल शब्दात गोदी कामगारांची बाजू कोतवाल यांनी मांडली. केंद्रीय मंत्रालयाने गोदी कामगारांच्याकडे दुर्लक्ष व दिरंगाई केल्यामुळे कामगारांच्यावर अन्याय झाला. शंभर पोत्याना दोन रूपये चौदा आणे एवढीच मंजूरी मिळत होती. ती वाढवून देण्याची कबुली नेहरूनी दिली. यांचे सर्व श्रेय कोतवाल यांच्याकडेच जाते. १९७८ साली देशातील सर्व गोदी कामगाराचा पगार एकसारखा करण्याची मागणी २४ दिवसाच्या संपाने कोतवाल यानीच मान्य करून घेतली. गोदी आणि माथाडी कामगारासाठी स्वेच्छा सेवानिवृत्तीचा पर्याय गोदी कामगारांना देण्यात आला यात भाई मनोहर कोतवाल यांचा सिंहाचा वाटा आहे.

सर्व जग फिरलेले भाई आपल्या डोळस निरीक्षणाचा मार्ग कामगाराना सांगताना अचूक वर्मावर बोट ठेवून म्हणतात, यापुढे माथाडीच्या जीवनावर येणारे यंत्रयुगाचे आक्रमण मोठे आहे. त्यांनी ते वेळीच पारखले पाहिजे. सत्वर व सदैव संघटित राहून त्या आक्रमणाचा मुकाबला केला पाहिजे. त्यासाठी माथाडीने व्यसनापासून दूर राहून आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणात, गावी असेल त्या थोड्याशा शेतीत आस्थेने लक्ष घातले पाहिजे.

"सुरूवातीला सव्वा रूपया मजुरी घेणारा माथाडी आज चार ते पाच हजार रूपये पगार घेतो आहे. माझ्यामुळे संपात आजवर एकही कामगार घरी बसलेला नाही. याचा मला सार्थ अभिमान वाटतो."[६] कामगाराना ताठ मानेने जगण्याची प्रेरणा आणि पत मिळवून देण्यामध्ये कोतवालाचा सिंहाचा वाटा आहे. श्रम हाच परमेश्वर आहे याची कामगाराना सतत जाणीव करून दिली. ज्येष्ठ कामगार नेते ना.म. जोशी, पी. डिमेलो यांचे मार्गदर्शन तर एन.डी. कांबळे, ज.रा. कांबळे, रमाकांत देसाई यांचे त्यांना सहकार्य मिळाले. भाई मनोहर कोतवाल हे कामगार चळवळीत सिंहासारखे

लढाऊ आहेत. तसेच ते कामगाराना आईच्या ममतेने वागवणारे प्रेमळ कामगार नेते आहेत. असा सिंहाचा लढाऊ बाणा व आईची ममता त्यांच्या ठायी एकवटली आहे हेच त्यांचे वेगळे वैशिष्ट्य वाटते.

कामगार हा एक माणूसच आहे. कामगार हीच त्यांची जात आहे. त्यासाठी त्यांच्यावर होणारा अन्याय कधीच सहन करायचा नाही. आपल्याला शक्य होईल तोपर्यंत अन्याय निपटण्यासाठी प्राणपणाने झगडत राहायचे, यश मिळो अथवा न मिळो हरायच नाही. हा एकच कर्मसिद्धांत 'संघर्ष' चरितकहाणीतून दिसून येतो.

### ३.५ वाराई कामगार यांच्यासाठी केलेले कार्य :

भाई मनोहर कोतवाल यांनी वाराई कामगारांच्यासाठीही मोठे योगदान दिले. वाराई म्हणजे फक्त ट्रकमध्ये पेटाऱ्यांची किंवा गोणींची चढउतार करणे. वारून नेणे, मर्यादित जागेत हमाली करणे होय. या कामाचा गोदीशी किंवा जहाजाशी कसलाही संबंध येत नाही. हे कामगार म्हणजे १४-१५ वर्षाची कुठून-कुठून मुंबईत आलेली अनाथ, बेवारशी मुलेच होती. पोटाची आग मिळणाऱ्या भाजी-पावावर भागवणारी, राबराब राबणारी संपूर्ण दुर्लक्षित अशी ही मुले होती. या मुलंचे वाराई कामगार सहकारी संस्था काढून भाईनी पुनर्वसन केले.

### ३.३.६ राजकीय सहभाग :

भाई मनोहर कोतवाल यांचा राजकारणातील सहभाग चरितकहाणीत संक्षिपाने सावत यांनी नोंदविला आहे. १९६२ मध्ये विधानसभेच्या प्रजासमाजवादी पक्षातून उमरखाडी मांडवी मतदार संघातून कोतवाल यांनी अर्ज दाखल केला. या निवडणूकीत ते पराभूत झाले. तसेच हिंदू मजदूर सभा मधील सहकारी, गोदी कामगारातील संयुक्त नेतृत्त्वाचे मित्र, प्रजासमाजवादी पक्षाचे ना.ग. गोरे, डॉ. जी.जी. पारीख, मधु दंडवते, रमाकांत देसाई, ज.रा. कांबळे, अमृत आगासकर, डांगे यांच्या आग्रहाने परत दक्षिण मुंबई मतदार संघातून थेट लोकसभेच्या निवडणुकीसाठी उभे राहिले. निवडणूक खूण होती 'झोपडी' विरोधी उमेदवार काँग्रेस स.का. पाटील, समाजवादी जॉर्ज फर्नांडिस असे उमेदवार होते. याही निवडणूकीत भाई मनोहर कोतवाल यांना पराभवाला सामोरे जावे लागले. जॉर्ज फर्नांडिस हे समाजवादी पक्षाचे उमेदवार निवडूण आले.

विधानसभेच्या व लोकसभेच्या अपेक्षाभंग करणाऱ्या पराभवामुळे भाई फारच अंतर्मुख झाले. कामगारांसाठी, सर्वसामान्य माणसासाठी निरपेक्ष भावाने सतत काम

करीत राहिलो. लोक त्याची कदर करतील लोकशाहीच्या या जमान्यात अधिक चांगले कार्य करण्याची आपणाला संधी देतील हा भाई कोतवालांचा ठाम विश्वास खोटा ठरला. नंतर भाई मनोहर कोतवाल यांनी १९७० मध्ये प्रजासमाजवादी पक्ष सोडून इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी निवडणूकीच्या राजकारणाला कायमचा निरोप दिला. सत्तेचा कोणताही लोभ त्यानी धरला नाही. मुंबई प्रदेश काँग्रेसच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली होती.

**सारांश :**

'संघर्ष' या चरितकहाणीतील भाई मनोहर कोतवाल यांचे व्यक्तिमत्व, स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, गिरणी कामगार यांचेसाठी केलेले कार्य, गोदी व माथाडी कामगारासाठी केलेले कार्य, त्यांचा राजकीय सहभाग या मुद्यांच्या आधारे भाई मनोहर कोतवाल यांच्या जीवनाचा वेध घेतला. त्यांचे धुळ्यातील बालपण, अकोला, नागपूर, नासिक येथील शिक्षण, मुंबईतील किंग जॉर्ज हायस्कूलमधील व टी बोर्डातील नाकरी व अखेरीस कामगार चळवळीचे लक्षणीय कार्य असे ठळक टप्पे या चरितकहाणीतून दिसून येतात. १९१५ ते १९९० पर्यंतचे केवळ जीवनचरित्र नसून कामगार चळवळीचा इतिहास, कामगार चळवळ, त्या क्षेत्रातील नेते, राजकीय आणि सामाजिक उलथापालथ याचाही उल्लेख सावंत यांनी चरितकहाणीत केला आहे. कोतवालांच्या आयुष्यातील नाट्यपूर्ण चढउतार आणि कोणत्या सामाजिक, राजकीय वातावरणात हे घडत आहे याचे चित्रण वाचकासमोर सावंत उभे करतात. 'संघर्ष' हे पुस्तक दिवाणखान्यातील शोभेचे पुस्तक होऊ नये याची पुरेपूर काळजी सावंत यांनी घेतलेली दिसून येते. या चरितकहाणीतील कोतवालाच्या प्रत्येक भागाला गोण पहिली,गोण दुसरी अशी नावे दिली आहेत. कामगार वाचकांना जवळची वाटेल अशी मराठी भाषा 'संघर्ष'मध्ये दिसून येते.

कामगार हा एक माणूसच आहे. कामगार हीच त्यांची जात आहे. त्यासाठी त्यांच्यावर होणारा अन्याय कधीच सहन करायचा नाही. आपल्याला शक्य होईल तोपर्यंत अन्याय निपटण्यासाठी प्राणपणाने झगडत राहायचे, यश मिळो अथवा न मिळो हरायचे नाही हा एकच कर्मसिद्धांत संघर्षमध्ये दिसून येतो. कामगारांचा पगार व दर्जा वाढविण्यासाठी धडपडणाऱ्या कोतवालांची चळवळ लढाऊ आणि टिकाऊ आहे. स्वातंत्र्याच्या आंदोलनातील कार्य, ब्रिटिश विरोधी क्रांतिकारक कृतीतील सहभाग या कोतवालाच्या विधायक कर्तृत्त्वाचा आलेख 'संघर्ष' मधून दिसून येतो.

## ३.४ पुरूषोत्तमनामा (२००२) :

'पुरूषोत्तमनामा' ही पी.के. अण्णा पाटील यांची २००२ साली प्रसिद्ध झालेली चरितकहाणी आहे. पी.के. अण्णांच्या जीवन कार्याचा वेध घेताना सांवत यांनी या चरितकहाणीचे बालकाण्ड, युवाकाण्ड, पुरूषार्थकाण्ड, साफल्यकाण्ड असे भाग करून पी.के. आण्णांच्या जीवनवृत्तांचा सविस्तर वेधघेतला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात समर्पणवृत्तीने व निस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांची फळी उभी राहिली. त्यातील अर्थ तज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ, डॉ. विखे पाटील आणि पी.के. अण्णा पाटील यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील व सहकार क्षेत्रातील कार्य महत्त्वाचे ठरले. या चरिकहाणीत पी.के. अण्णाच्या कुटंबाची वंशवेल, त्यांची राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्याची छायाचित्रे सावंत देतात. 'पुरूषोत्तमनामा'शी निगडीत नेते व पुढारी यांची यादी नंदुरबार जिल्ह्यातील सामान्य शेतकरी यांच्यासाठी पी.के. अण्णांनी केलेल्या कार्याची माहिती, तक्ते याचीही नोंद सावंत यांनी केली आहे.

पी.के. अण्णा पाटील यांचे व्यक्तिमत्त्व, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सहकार क्षेत्रातील त्यांचे कार्य या मुद्यांच्या आधारे 'पुरूषोत्तमनामा' या चरितकहाणीचा वेध घेणार आहोत. प्रारंभी पी.के. अण्णा पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परामर्श घेऊ.

## ४.१ पी.के. अण्णा पाटील यांची जडणघडण :

पी.के. अण्णा पाटील यांचा जन्म १९२३ रोजी मामाचे मोहिदे गांवी झाला. त्यांच्या वडिलाचे नाव काळूभाई तर आईचे नाव भिकीबाई तथा देवकीबाई. पी.के. अण्णाना बुलाभाई, हा सावत्र बंधू तर 'नगीन' हा त्यांचा सखा लहान भाऊ होता.

लहान वयातील पुरूषोत्तम हा परसू होता. या परसूवर आईचे देवकीबाई तथा देवाबाईंचे प्रेम होते. त्याची फारच काळजी त्या घेत असत. देवाबाई अत्यंत साधी, गुजर कष्टकरी, कपाळावर कुंकुटिळा, हातात बांगड्या, अंगात काचोळी नी नऊवारी लुगडं असा तिचा वेश होता. परसूचे बालपण खानदेशी आडगावातील व कष्टकरी शेतकऱ्याच्या घरी मजेत गेले. आई-वडिलांचे संस्कार परसूवर पडलेले दिसून येतात. लहानपणी बालसवंगडीबरोबर सूरपारंब्या, कुस्ती, आट्यापाट्या, लगोरी हे खेळ

खेळण्यात दंग असे सावंतानी पुरूषोत्तमच्या बालपणीच्या आठवणींचा आलेख दिला आहे. गोमाई नदीत पोहायला जाणे, विविध खेळ खेळणे असे त्याचे बालपण होते.

लोणखेडा येथील स्कूल बोर्डाच्या प्राथमिक शाळेत पुरसूने प्रवेश घेतला. पठाडे, टेंभेकर हे या शाळेतील त्यांचे शिक्षक होते. सुटीच्या दिवशी वडिल काळूभाई यांच्या बरोबर परसू शेतावर जात होता. घरी बोली चालीची गुर्जरी भाषा, शाळेत खानदेशी मराठी भाषा आणि वडिलांनी घोकून घेतलेली गणिताची पायाभरणी, परसूचा प्राथमिक शिक्षणाचा असा तिपेडी, पीळदार गोफ तयार हाऊ लागला. शाळॅच्या हंगामात परसू 'हुरडा पार्टी'त दंग असे.

माध्यमिक शिक्षण इंग्रजी माध्यमातून 'शहादा' येथे झाले. ही शहादाची गांगल मास्तरांची शाळा. पी.के. ची एक मर्म बंधाची ठेव ठरली. माध्यमिक शिक्षण घेताना मोहिनीराज देशमुख यांचेसारखे आदर्श पुरूष भेटले होते. या वयातच स्टुडंटस् फेडरेशन मध्ये ते सक्रिय झाले. सानेगुरूजींच्या देशकल्याणी आणि निखळ मानवतावादी विचारांनी पी.के. च्या भावी जीवनाची पायाभरणी केली. पुढील शिक्षणासाठी नंदुरबार येथील टिळक विद्यालयात ते दाखल झाले. येथे शिक्षण घेत असताना पी.के. ना ऐन तारूण्याच्या उंबरठ्यावर असताना साने गुरूजींच्या राष्ट्र सेवादलाचे प्रबोधनपर कार्य त्यांच्या मनावर कायमचे ठसले. म. गांधीजींची 'चलेजाव' ची निर्णायक घोषणा, त्यांच्या मनात रूजली होती. शाळेत असतानाच अनेक देशभक्तीपर गीतातून, स्वातंत्र्य प्रेमाची आवड निर्माण होत होती. नंदुरबार येथे मॅट्रिक पास झालेनंतर बडोदा येथील सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात पुढील शिक्षणासाठी दाखल झाले. त्यांनी इथे वाणिज्य शाखेचीपदवी प्राप्त केली. विधी शाखेची पदवी त्यांनी पुणे येथे घेतली. एलएल.बी. झालेले पी.के. यांनी आपली नंदुरबार येथे अकरा वर्षे वकिली केली. ५ मे, १९५५ रोजी जांबोली या खानदेशी आडगावात कमल भुत्ता पाटील या मुलीशी अत्यंत साध्या पद्धतीने पी.के. अण्णानी विवाह केला. फार कष्टाने कमलताई संसार करू लागल्या होत्या. पुढे अपत्य प्राप्ती न झाल्याने पी.के. नी आपल्या नागीनभाई या बंधूचा मोठा मुलगा दिपक याला दत्तक घतले. वाढते वय, शिक्षण, अनुभव यांच्यामुळे पी.के. अण्णाची मूळची चौकस, सकस व सर्वसमावेशक दृष्टी विस्तारत गेली. त्यांनी भारतातील तीर्थक्षेत्रे, यात्रा स्थळांना भेटी दिल्या. इस्त्रायल, अमेरिका, ब्राझील, इंग्लंड, जर्मनी, जपान,

थायलंड, फ्रान्स अशा प्रगतशील देशांचा दौराही केला. यानंतर त्यांच्या सहकार, शैक्षणिक कार्याचा वेध घेऊ.

### ३.४.२ पी.के. अण्णा यांचे सहकार क्षेत्रातील कार्य :

पी.के. अण्णा पाटील यांनी सहकार क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केले आहे. सातपुडा-तापी परिसर सहकारी साखर कारखाना १९७० मध्ये शहादे तालुक्यात उभा करून या साखर कारखान्याच्या परिसरात विविध प्रकारचे सहकारी प्रकल्प कार्यान्वित केले. यामध्ये मद्यार्क निर्मिती प्रकल्प, कागद व पार्टीकल बोर्ड प्रकल्प हे ऊसाच्या उर्वरित भागावर अवलंबून असलेले प्रकल्प उभा केले. महात्मा गांधीजींच्या तत्त्वप्रणालीवर नितांत श्रद्धा असणाऱ्या आणि साने गुरूजींच्या सहवासाने आणि संस्कारांनी वाढलेल्या पी.के. अण्णांनी हे प्रकल्प उभा करून कष्टकरी शेतकरी, भूमिहीन, शेतमजूर व असंख्य आदिवासी बांधवांना बळ दिले. पन्नास हजार आदिवासींना रीतसर धुळ्याच्या सहकारी स्टार्च कारखान्यात सदस्यत्व दिले. हे पी.के. अण्णांचे कार्य स्वतंत्र भारताच्या इतिहासात नोंदविण्यासारखे आहे. धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष असताना पाच हजार एकर इतकी जमीन आदिवासी मूळ मालकांना परत केली. जनता सहकारी बँकेच्या मार्फत या दुबळ्या घटकांना मदतीचा हात दिला. लोकनायक जयप्रकाश नारायण सूतगिरणीची स्थापना पी.के. अण्णांनी करून सहकार क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला. सहकारी जलसिंचन योजना कार्यान्वित केल्या. सहकारातील एक नवा आदर्श पी.के. अण्णांनी निर्माण केला.

### ३.४.३ शैक्षणिक क्षेत्रातील कार्य :

पी.के. अण्णा पाटील यांनी शहादा परिसरात उल्लेखनिय असे शैक्षणिक कार्य केले आहे. दोनशेहे एकराच्या सलग भूखंडावर पू.साने गुरूजी शिक्षण संकुल उभा करून समाजात एक नवा आदर्श निर्माण केला. या संकुलामार्फत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पदव्युत्तर आणि एम.फिल. व पीएच.डी. विषयक संशोधनपर मार्गदर्शनाची उत्तम सोय. अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्रनिकेतन, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, इंग्रजी माध्यमाचं सांदीपनी पब्लिक स्कूल, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ग्रामीण संशोधन व व्यवस्थापन संस्था, औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, माळी प्रशिक्षण केंद्र, भारतीय इतरभाषा प्रगत अध्ययन केंद्र, वसतिगृह, समृद्ध ग्रंथालय, अशा शैक्षणिक क्षेत्रातील सर्व सुविधा पी.के. अण्णा पाटील यांनी

केल्या आहेत. शहादा परिसरात शैक्षणिक संस्था उभ्या करून ज्ञान दानाचे एक महत्त्वाचे शैक्षणिक कार्य पी.के. अण्णांनी करून दाखवले आहे.

या सानेगुरूजी शिक्षण संकुलाबरोबरच आदिवासी सातपुडा शिक्षणप्रसारक मंडळ, धडगाव, स्थापन करून नंदुरबार या आदिवासी परिसरातील मुलांच्या शिक्षणाची सोय पी.के. अण्णानी करून दिली. या शैक्षणिक मंडळामार्फत केवळ बौद्धिक ज्ञान दिले जात नाही तर चौफेर डोळसदृष्टीने कार्यक्रम आखले जातात. पी.के. अण्णानी, या शिक्षणसंस्थामार्फत मोठ्याप्रमाणात 'स्त्री आरोग्य आणि समस्या' एडस् निर्मूलन असेही उपक्रम शिक्षणसंकुलामार्फत राबविले आहेत. आशिया खंडातील प्रथम क्रमांकाचे वाचनालय साने गुरूजी संकुलामार्फत उभा करण्यात आले आहे. सहकार क्षेत्रातील कार्याबरोबरच पी.के. अण्णानी शैक्षणिक क्षेत्रात फार मोठी कामगिरी केली आहे.

### ३.४.४ स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग :

पी.के. अण्णा पाटील यांनी विद्यार्थी दशेत शालेय शिक्षण घेत असतानाच देशस्वातंत्र होण्यासाठी म. गांधीजी, साने गुरूजी, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला. म. गांधीजींच्या 'चलेजाव', 'असहकार' च्या चळवळीत पी.के. अण्णा यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. "ब्रिटीशानोंऽ" चलेऽ जाऽऽव, महात्माऽ गांधीऽ की ऽऽ जऽ य" (पृष्ठ १०९) अशा घोषणा देणाऱ्या विद्यार्थ्यासह पी.के. अण्णा, शिरीषकुमार, लालदास, शशिधर, घनश्याम, धनसुख रतिलाल, धीरजलाल, भगवानदास, सन्मुख शहा असे घोषणा देत होते. पोलिसानी झोडपून काढून रितसर ताब्यात घेतले. त्यावेळी पी.के. १९ वर्षाचे होते. त्यावेळी नंदुरबारच्या माणिक चौकात झालेल्या गोळीबारात शिरीषकुमार, रतिलाल उर्फ लालदास, शशिधर, घनश्याम, धनसुख जागेवरच कोसळले, पोलिसांचा गोळीबार देशासाठी हसत झेलणाऱ्या या देशनिष्ठ सेवकांच्या बलिदानाचा परिणाम. पी.के. यांच्या मनावर झाला. पी.के. आण्णा पाटील यांनाही तारूण्याच्या उंबरठ्यावर धुळे येथील केंद्रिय कारागृहात ठेवण्यात आले. पुढे १९६० ला संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही प्रत्यक्ष सहभाग घेतला.

### ३.४.५ राजकीय सहभाग :

पी.के. अण्णा पाटील यांचा राजकीय सहभाग 'पुरूषोत्तमनामा' चरितकहाणीत संक्षिपाने सावंतानी नोंदविला आहे. कायद्याची पदवी घेतल्यानंतर पी.के. अण्णानी

अकरा वर्षे नंदुरबार येथे वकिली केली. त्यानंतर धुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ते लोकनियुक्त अध्यक्ष झाले. या काळात ज्याच्या हाती सहकारी बँक तो 'पुढारी' असे समिकरण होते. १९५७ पासूनच अण्णांच्या जीवनातील प्रत्यक्ष राजकारणात संबंध आले. बँकेचे अध्यक्ष म्हणून प्रथम नंदुरबार इथे सुरू झालेल्या बिडी कामगार युनियनशी त्यांचा संबंध आला. याच शहरातील वकील संघटनेच्या क्रीडा क्लबचे अध्यक्ष म्हणून त्यानी धुरा सांभाळली होती. राजकीय आघाडीवर अण्णा कधी काँग्रेसमार्फत, कधी जनता पक्षाकडून व कधी अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरले. त्यावेळी राजाराम बापू पाटील जनता दलाचे अध्यक्ष असताना 'शहादात अधिवेशन' घेण्याचा निर्णय झाला. चंद्रशेखर, मोरारजी देसाई यांच्या उपस्थितीत पी.के. अण्णांनी हे अधिवेशन नियोजनपूर्वक पार पाडले. १९७८ मधील विधानसभा निवडणूकीत पी.के. अण्णा पराभूत झाले. १९८० च्या विधानसभा निवडणूकीत 'शहादातून' निवडून आले. १९८५ च्या विधानसभा निवडणूकीत जनता पक्षातर्फे तिसऱ्यावेळी निवडणूकीत उभे राहिले. निवडणूकीत चिन्ह होते 'नांगरधारी शेतकरी' या निवडणूकीत ते निवडूण आले. पी.के. अण्णानी राजकारणाचा उपयोग सहकार, शैक्षणिक संस्थेच्या विकासासाठी करून घेतला. समाजकारण हेच त्यांचे राजकारणातील सहभागाचे ध्येय होते.

पी.के. अण्णा दोन वेळेला आमदार झाले. परंतु १९९१ साली झालेल्या निवडणूकीत 'एरंडोल' मतदार संघातून त्यांना जनता दलातर्फे लोकसभेची उमेदवारी दिली. परंतु या निवडणूकीत ते पराभूत झाले. त्यानंतर १९९२ साली काँग्रेस पक्षात पी.के. अण्णानी प्रवेश केला. याच पक्षातर्फे त्यांना राज्यपरिवहन मंडळाचे अध्यक्षपद आणि तापी खोरं विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली. या काळात पी.के. अण्णांचे राजकारणातील चंद्रशेखर, राजेश पायलट, शरद पवार, सुधाकरराव नाईक यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध होते. १९९५ च्या विधानसभा निवडणूकीत पी.के. अण्णा काँग्रेस पक्षातून निवडणून आले. १९९९ च्या विधानसभा निवडणूकीत पी.के. अण्णा पराभूत झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादीचे डॉ. हेमंत देशमुख निवडून आले. आपला पराभव 'त्यांनी तेवढीच' विश्रांती असे मानून खिलाडू वृत्तीने स्वीकारला होता. पी.के.अण्णांची राजकीय कारकीर्द जय पराजयाच्या गर्तेतून चालली होती. राजकारणातील सहकार्याचा उपयोग करून पी.के. अण्णांनी सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था उभ्या केल्या. 'पुरूषोत्तमनामा' या चरितकहाणीत पी.के.

अण्णांचा राजकीय सहभाग यांची सूक्ष्मपणे सावंत यांनी नोंदी केल्या आहेत. यानिमित्ताने देशातील राजकारणाची स्थितींचा उल्लेखही सावंत करतात.

### ३.४.६ पुरूषोत्तमसेना :

कुठल्याही कर्तबगार पुरूषाच्या जीवनात त्याच्यातील सत्त्वाची परीक्षा घेणारे, त्याला उभा-आडवा तावून-सुलाखून काढणारे प्रसंग येत असतात. व्यक्तिगत व कौटुंबिक जीवनात आजवर पी.के. अण्णांच्या समोर असे प्रसंग आलेले दिसतात. त्या प्रत्येक प्रसंगी धीरोदात्तवृत्तीने अण्णा सामोरे गेलेले दिसतात. १९७२-७३ साली मात्र त्यांच्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनात एक मोठाच प्रश्न उभा राहिला. तो 'पुरूषोत्तमसेना' या नावानं उभ्या महाराष्ट्रभर वृत्तपत्रांत गाजला होता. साप म्हणून दोरी धोपटून धोपटून थकलेल्या वृत्तपत्रांनी व अनेकविध क्षेत्रातील दिग्गजांनी या 'पुरूषोत्तम सेने'चा तथाकथित गाजावाजा थांबविला. पी.के. अण्णाच्या विरोधी मंडळींचे 'पुरूषोत्तम सेना' हे षड्यंत्र होते. १९७२ च्या दुष्काळात मजुरी न मिळाल्यानं उपासमारीमुळे आदिवासींनी व बेरोजगारांनी चोऱ्या आरंभिल्या. त्या थांबवण्यासाठी घेतलेल्या पीक संरक्षण सोसायट्यांच्या बैठकीत जोरदार चर्चा झाली. पिकांचे संरक्षक म्हणून रजपूत आणि काही आदिवासी व मराठे असे लोक होते. त्यांना प्रत्येक सोसायटीकडून जुन्या दुबारी बंदुका संरक्षणासाठी दिल्या होत्या. या कामासाठी त्याना पगारही दिला जात असे. चोऱ्या करणाऱ्या बेरोजगारांशी त्यांच्या चकमकी घडू लागल्या. यात धुळे जिल्ह्यातील कम्युनिष्ठ पक्षाचे कार्यकर्ते उतरले. त्यांच्या चिथावणीमुळे एके दिवशी बेरोजगार व उपाशी आदिवासींनी एक गोदाम लुटण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सावध असलेल्या पीक संरक्षकांनी त्याचा हल्ला मोडून काढण्यासाठी गोळीबार केला. त्यात काही लोकांचा मृत्यू झाला. वृत्तपत्रांनी याची तात्काळ नोंद घेतली. वास्तविक घडलेल्या सर्व घटनांत पी.के. अण्णांचा कसलाच संबंध नव्हता. त्यांच्या राजकीय हितशत्रूंना उद्रेकाच्या पेटलेल्या या अग्नीत अण्णांच्या वाढत्या व्यक्तिमत्त्वाची रेखा भाजून काढणं सोयीचं वाटले. त्यांनी नासिकच्या एका पत्रकाराला हाताशी धरले त्यांच्या वार्तेत 'पुरूषोत्तमसेना' हा शब्द सर्वप्रथम आला. तसा तो हेतुतःच घालण्यात आला होता. पाठोपाठ पुण्याच्या ग.वा. बेहरे यांच्या 'सा.सोबत'मध्ये असे लेख आले. त्यांचीच री ओढत दै. महाराष्ट्र टाइम्सने चक्क अग्रलेखच लिहिला तो छापून येताच उभ्या महाराष्ट्राचं लक्ष शहाद्याकडे लागले. सर्वत्र चर्चा सुरू झाल्या. यावेळी अण्णांचं हितशत्रूंनी उभं केलेलं चित्र होते. ते असे

"तापी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पी.के. अण्णा पाटील यांनी आपली बंदुकधारी पुरूषोत्तम सेनाच स्थापन केली आहे. तिच्यामार्फत ते अडाणी व गोरगरीब आदिवासीचं पद्धतशीर शोषण करताहेत. या सेनेनं गोळीबार करून आदिवासीचे मुडदेही पाडले आहेत."[७] (पृष्ठ ३६३) या वृत्तपत्रातील बातमीचे कसलही समर्थन देण्यासाठी कुठल्याही संपादकाचे उंबरठे अण्णानी झिजवले नाहीत. या बातम्या वाचून केंद्रीय अन्न राज्यमंत्री ना. आर.के. पाटील, शहाद्यात आले. अण्णांनी भेट घेऊन आपली बाजू समजावून सांगितली. त्याच्या पाठोपाठ वरोड्याला आनंदवनात कुष्ठरोग्यासाठी पुनर्वसनाचे काम करणारे बाबा आमटे आले, सर्वोदयातील विचारवंत अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे आले. म. टाईम्सचे प्रतिनिधी विजय तेंडूलकर आले होते. या सर्वांना अण्णांनी आपली भूमिका पटवून सांगितली.

आदिवासीना मध्यवर्ती बँकेत अध्यक्ष असताना पी.के. अण्णांनी पाच हजार जमिनी आदिवासीना परत मिळवून दिल्या. स्टार्च (खळ) कारखान्याचे सभासद केले. या सर्व गोष्टी अण्णांनी आदिवासीसाठी केल्या होत्या. आलेली सगळी मंडळी अण्णांचा निरोप घेऊन गेली. 'पुरूषोत्तमसेना' आणि तिच्याकडून आदिवासीचं तथाकथित 'शोषण' हे काही राजकीय हितशत्रूंनी उठविलेलं षड्यंत्री वादळ अखेर 'पेल्यातील वादळच' ठरलं.

**सारांश :**

'पुरूषोत्तमनामा'या पी.के. अण्णा पाटील यांच्या चरितकहाणीचा वेध आपण घेतला. हा वेध घेत असताना पी.के. अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, त्यांनी सहकार, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याचा आढावा घेतला. मोहिद्यात जन्मलेले लोण खेड्यात वाढलेले, शहादा, नंदुरबार, बडोदा,पुणे अशा ठिकाणी लौकिक शिक्षण घेतलेले, गुजर समाजातील पुरूषोत्तम काळूभाई पाटील यांच्यावर राष्ट्रसेवा दलाचे संस्कार, म. गांधी, सरदार पटेल, पू. सानेगुरूजी, लोकनायक जे.पी. यांच्या पारदर्शक विचारांचे जीवनसंस्कार त्यांनी मंत्रासारखे सुप्त मनांच्या कुपीत जपलेले दिसून येतात. चरितकहाणींच्या प्रारंभीच त्यांचा धावता आलेख सावंतानी दिला आहे. पी.के. अण्णा पाटील गुर्जर समाजातील असल्यामुळे काही काळ त्यांनी अ.भा. गुर्जर समाजाच्या संघटनेची सेक्रेटरी पदची जबाबदारी पार पाडली. या समाजातील लग्न समारंभातील 'हुंडापद्धती' प्रथा त्यांनी बंद केली. 'नवमित्र' साप्ताहिक आणि 'पुरोगामी' नियतकालिक पी.के. अण्णांनी चालविली.

स्वत: संपादकाची जबाबदारी निष्ठेने पेलली. याचा उल्लेखही सावंतानी चरितकहाणीत केला आहे. त्या काळातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील 'दारफळ' गावच्या 'धान्यकोश' 'धान्यांच्या बँकेचा' उल्लेखही सावंत या चरितकहाणीत करतात.

'पुरूषोत्तमनामा' या चरितकहाणीचा शेवट साने गुरूजींच्या 'खरा तो एकची धर्म जागाला प्रेम अर्पावे' या गीताने सावंतानी केला आहे. पी.के. अण्णांच्या कार्यक्षेत्रातील शहाद्यातील शिक्षण व औद्योगिक संकुलातील बांधकामाचे तपशिल, पुरूषोत्तमनामांशी निगडीत पुढारी, नेते यांची नामावली, अण्णांच्या सहयोगी कार्यकर्त्यांची गाववार नामनिर्देश विविध संस्थांचे पदाधिकारी यांची सालवार माहिती, अण्णांचे परदेश दौरे, अण्णांच्या विविध क्षेत्रातील कार्यांची 'छायाचित्रे' सावंत यांनी या चरितकहाणीत दिली आहेत. पी.के. अण्णांच्या जीवनवृत्तांताचे एक उत्तम संकलनच ही चरितकहाणी वाचताना जाणवते.

महाराष्ट्रात तापी नदीच्या काठी स्थिरावलेल्या आपल्या कष्टकरी, प्रामाणिक, मागासलेल्या, भटक्या, गुर्जर समाजाला मात्र ते कधी पारखे झाले नाहीत. वाढते वय, शिक्षण, अनुभव यांच्याकडे पी.के. अण्णांची मूळची चौकस, सकस व सर्व समावेशक दृष्टी विस्तारत गेली. जगभराच्या भ्रमंतीत जे जे जीवनाच्या वाढीसाठी व विकासासाठी आवश्यक आहे ते ते ज्ञान-विज्ञान अण्णांनी आपल्या कर्मभूमीत शहाद्यात खेचून आणले. याचेही तपशिलवार विवेचन चरितकहाणी वाचत असताना जाणवते.

## ३.५ शिवाजी सावंत यांच्या 'चरितकहाणी'चे वाङ्मयीन विशेष :

'लढत', 'संघर्ष', 'पुरूषोत्तमनामा' या चरितकहाणीतून विखेपाटील भाई मनोहर कोतवाल, पी.के. आण्णा पाटील यांच्या जीवनाबरोबरच राजकीय, सामाजिक, सहकारविषयक सर्व घडामोडींचा इतिहासच वाचकाना सुत्रबद्ध स्वरूपात वाचायला मिळतो. वास्तवता, सत्यता, अनुरूप वातावरणनिर्मिती, ग्रामीण बोली भाषा या सर्व गुणांनी हे लेखन समृद्ध आणि परिपूर्ण झालेले दिसून येते. महाराष्ट्राची परंपरा आधुनिक युगाशी जोडणारे या चरितकहाणीतील नायक युगप्रवर्तक वाटतात. या चरितकहाणीतून प्रतिमाचा वापर केलेला दिसून येतो. उदाहरणार्थ 'कोजागिरीच्या पोर्णिमेच्या चांदासारखे शांत दिवणारे वैकुंटभाई मेहता' (पृ. ३८७), 'तेहतीसकोटी सिंहाना तीन लाख दडपितो कोल्हा' (पृ.२६) 'म. गांधीजींचे विचार संस्कारशील

मनावर कोरीव लेण्यासारखे उमटले होते' (पृ.८१) या सारख्या चरितकहाणीतून येणाऱ्या वाक्यातून प्रतिमा आणि प्रतिकांचा वापर केलेला दिसून येतो.

चरितकहाणीतील पल्लेदार वाक्यरचना सावंताच्या खुमासदार लेखनीचा एक उत्तम नमुना वाटतो. उदाहरणार्थ "माणसांच्या जिंदगींच्या भगवद्‌गाथेचं असलं पान माझ्या इवल्या डोळ्यासमोर उलगडून चिमूकल्या काळजाला पिळवटून काढणारं असतानाही कुणी तरी धरलं होतं" (पृ.२१), "माझ्या रोजच्या पोथी पठनाच्या वेळी अधूनमधून वडार समाजातला एक म्होरक्या रामचंद्र बापू चव्हाण भक्तिभावानं पोथी ऐकायला आपल्या वस्तीवर येऊन बसत असे." (पृ.३४२) अशा सारख्या पल्लेदार वाक्यरचना चरितकहाणीतून दिसून येतात.

विखे पाटील, भाई मनोहर कोतवाल, पी.के. आण्णा पाटील यांच्या भावाभिव्यक्तीचे चित्रण उठावदार पद्धतीने केले आहे. लगड नावाच्या शेतकऱ्याच्या मृत्युनंतर "शेतकऱ्याला काळ्या आईच्या या कष्टाळू पोराला कुणी वाली उरलाय की नाही ? असे सडेतोडपणे विखे पाटील गावकऱ्यांच्या समोर बोलतात." श्यायब बारशाला येऊन तेराव्याचं जेवण जेवायची सवय नाही आम्हा मराठमोळ्या माणसांस्नी (पृ.१३१) अशी ग्रामीण लालित्यपूर्ण भाषा या चरितकहाणीतून दिसून येते. सावंतानी 'लढत', 'संघर्ष', 'पुरूषोत्तमनामा' ह्या चरितकहाणीला दिलेल्या शीर्षकातून अलंकारिता दिसून येते.

महाराष्ट्राची परंपरा आधुनिक जगाशी जोडणारे, गोरगरिबांच्या कल्याणासाठी अहोरात्र कष्ट करणारे आणि ध्येयासाठी उरीपोटी उपाशी राहून अविरत धडपडणारे असे नायक या चरितकहाणीतून सावंतानी शब्दबद्ध केले आहेत. 'लढत'मधील विठ्ठलरावांनी संतांचा बोध घेऊन परखड उपदेशातून गोरगरिब शेतकऱ्यांना जागृत केले आहे. भाई मनोहर कोतवाल यांनी माथाडी कामगारांचे प्रबोधन केले. पी.के. अण्णानी साने गुरूजींचे विचार आत्मसात करण्यासाठी आपल्या समाजाला प्रवृत्त केले. बोधवादी व उपदेशात्मक दोन्ही तत्त्वाशी चरितकहाणीचे जवळचे नाते आहे. आजच्या काळात सहकाराचे प्रत्येकक्षेत्र भ्रष्टाचाऱ्याच्या आणि स्वार्थीलोकांच्या स्वभावाने मलीन झाले आहे. सहकार तत्त्वावरची सामान्य माणसाची भावना आणि विश्वास कमी झाला आहे. अशा काळात सहकाराने शेतकरी, कामगारांचे जीवन समृद्ध केलेल्या या चरितकहाणीतील चरितनायकानी समकालीन समाजाला आदर्शाचा मार्ग दाखविला आहे. यासंदर्भात डॉ. रामचंद्र देखणे म्हणतात, "लढत ही

साहित्यकृती, व्यक्तिगत विठ्ठलराव विखे पाटलांची कथा न राहता कृषि क्षेत्रात कृषिपंढरी निर्माण केलेल्या कृषिविठ्ठलाची गाथा म्हणून ती उभी राहते. ही किमया शिवाजी सावंत यांची आहे."[८]

समाजातील आर्थिक पातळीवर अगदी खालच्या टोकाला असणाऱ्या एका स्तरांचे पुढारीपण स्वीकारून समूहाच्या उद्धारार्थ वरच्या स्तराविरूद्ध म्हणजेच सावकार, व्यापारी व बडे बागाईतदार यांच्याविरूद्ध पुकारलेले ते एक वेड आहे. हा संघर्ष क्रांतिकारक विचारातून उदयाला आला आहे. तरीही तो विघातक मार्गाने रक्तरंजित मार्गाने जात नाही. विधायक कार्य उभारणीसाठी समाजाकडून जो विरोध होत असतो तो इथेही होताना दिसतो.

**समारोप :**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सहकार, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात समर्पकवृत्तीने व निस्वार्थी भावनेने काम करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांची फळी उभी राहिली. त्यातील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, भाई मनोहर कोतवाल, पी.के. अण्णा पाटील यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत सहकार क्षेत्रातील कार्य महत्त्वाचे ठरले आहे. या चरितकहाणीतील भाषा सर्व सामान्य समाजाला समजेल अशी ग्रामीण बोलीभाषा आहे. सावंतांच्या लढत, संघर्ष, पुरूषोत्तमनामा या तीन चरितकहाण्यांमधून अनुक्रमे विखे पाटील, भाई मनोहर कोतवाल, पी.के. अण्णा पाटील या तीन कर्तृत्त्ववान पुरूषांच्या जीवनवृत्तांताचा, जीवन संघर्षाचा, जीवनकार्याचा चरित्रात्मक वेध घेतला. या तिघांनी व्यक्तिगत जीवनाच्या मर्यादा ओलांडल्या आणि त्यांचे जीवन संस्थात्मक समष्टीगत झाले. त्यामुळे त्यांच्या चरितकहाण्या समकालीन समाजजीवनाचा, संस्थापक जीवनाचा प्रत्यय देणाऱ्या आहेत. संस्थात्मक आणि सामाजिक जीवनातील ताणतणाव, अनुकूल प्रतिकूल प्रतिक्रिया, सामाजिक संघर्ष, अर्थकारण अशा घटकांनी हे लेखन समृद्ध झाले आहे.

-----

## संदर्भटिपा

१) सावंत, शिवाजी : 'लढत' (भाग-१), प्रकाशक डॉ. आर.जी. काकडे, अध्यक्ष, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, प्रवरानगर, प्र.आ. १९८५, पृ. १३७.

२) सावंत, शिवाजी : उनि., पृ. १०३.

३) सावंत, शिवाजी : उनि., पृ. ११.

४) सावंत, शिवाजी : 'संघर्ष', प्रकाशक श्री एन.डी. कांबळे, अध्यक्ष,भाई मनोहर कोतवाल समिती, पुणे विभाग, प्र.आ., १९९५, पृ. २६.

५) सावंत, शिवाजी : उनि., पृ.१४६.

६) सावंत, शिवाजी : उनि., पृ.३३७.

७) सावंत, शिवाजी : 'पुरूषोत्तमनामा', प्रकाशक डॉ. डी.के. सोनार, समन्वयक, पू. सानेगुरूजी विद्या प्रसारक मंडळ,शहादा, प्र.आ. ९ ऑक्टोबर, २००२, पृ. ३६३.

८) देखणे, रामचंद्र : 'लढत: कृषि विठ्ठलाची गाथा', (संपा. वाघ, शांताराम : शिवाजी सावंत व्यक्ती आणि साहित्य), शशिदीप प्रकाशन, पुणे, प्र.आ., २००१, पृ. ९८.

-----